cmyk

## संपादकीय

### महागाई कमी चे उत्तर नकारार्थीच !

नुकताच आंतरराष्ट्रीय कामगार संघटनेचा एक अहवाल समोर आला आहे. त्यात भारतातील महागाई आणि बेरोजगारीच्या मुद्यावर चिंता व्यक्त करण्यात आली आहे. एका सर्वेक्षणानुसार देशात महागाई २३ टक्क्यांनी वाढली आहे तर २७ टक्के तरुण बेरोजगारांची वणवण सुरू आहे. त्यामुळे लोकसभा निवडणुकीत महागाई आणि बेरोजगारी कळीचे मुद्दे ठरणार आहेत. त्यानंतर विकास, हिंदुत्व, राममंदिर यासारख्या गोष्टी लक्षात घेतल्या जातील. महागाई आणि बेरोजगारीच्या मुद्यावर नागरिकांनी मत देताना विचार केला तर भाजप अडचणीत येऊ शकतो.


दैनिक राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com


## गृहमंत्रालयाच्या दुसऱ्या मजल्यावर आग

नवी दिल्लीः केंद्रीय गृह मंत्रालयाच्या दुसऱ्या मजल्यावर मंगळवारी (१६ एप्रिल) सकाळी आग लागली. या आगीमुळे कार्यालयात एकच खळबळ उडाली. आग लागल्यानंतर अग्निशमन दलाने तात्काळ घटनास्थळी धाव घेत आग आटोक्यात आणली.

या घटनेबाबत अग्निशमन विभागाच्या अधिकाऱ्याने सांगितले की, आग लागल्याची माहिती मिळताच अग्निशमन दलाने सकाळी ९:३५ पर्यंत आग आटोक्यात आणली. ही आग गृह मंत्रालयाच्या कार्यालयातील आयसी विभागात दुसऱ्या मजल्यावर लागली होती. सुदैवाने या आगीत कोणतीही जीवितहानी झाली नाही.

बीड – महाराष्ट्र | वर्ष – ४ | अंक–७ | बुधवार दि.१७ एप्रिल २०२४ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | • पाने– ६ | किंमत ३ रूपये

# मतदान करायचे की नाही, हे आम्ही ठरवणार...!

## नाशिक जिल्ह्यात कांदा उत्पादक आक्रमक, गावात लागले मते न मागण्याचे बॅनर

**नाशिक । प्रतिनिधी**

लोकसभा निवडणूक कार्यक्रम जाहीर झाल्यानंतर आर्थिक विवंचनेत असलेल्या माळवाडी ता देवळा येथे मंगळवारी (दि.१६) रोजी ग्रामपंचायतसह सर्व कांदा उत्पादक शेतकरी एकत्र येत ''तुम्हाला मतदान करायचे की नाही, हे आता आम्ही ठरवणार..'' सत्ताधारी–विरोधक लोकप्रतिनिधींनी मत मागायला येऊ नये, आशा आशयाचे फलक लावण्यात आले आहे.

कांदा उत्पादक शेतकरी गेल्या अनेक वर्षांपासून आर्थिक भुर्दंड सोसत आहेत. कांदा शेती करण्यासाठी लागणारा खर्च बघता त्या प्रमाणात कांद्याला दर मिळत नाही. म्हणून गेल्या वर्षी मार्च महिन्यात '' संपूर्ण गाव विकायला काढले'' त्यावेळी माळवाडी येथे व्यथित शेतकऱ्यांना भेटायला कोणीही सत्ताधारी अथवा मूग गिळून गप्प असणारे विरोधकही आले नाहीत, म्हणून आज मत मागायला येऊ नका असे म्हणणे कांदा उत्पादक शेतकरी यांनी ठरवले ◀◀ पान २ वर



### सरकारच्या धोरणाने शेतकरी देशोधडीला

केंद्र सरकार कांदा दर पाडण्यासाठी अतोनात प्रयत्न करून दर नियंत्रणात ठेवते, त्यात अमर्यादित निर्यातबंदी कांदा उत्पादकांच्या माथी मारत आल्याचा मोठा इतिहास हा देश बघतो आहे, परंतु कृषी विभाग आणि केंद्र सरकारच्या धरसोड धोरणांमुळे कांदा उत्पादक शेतकरी देशोधडीला लागत चालला असल्याची खंत शेतकऱ्यांनी बोलून दाखविली.

## पंतप्रधान म्हणून ६४ टक्के लोकांची नरेंद्र मोदींना पसंती

### डेलीहंट ट्रस्ट ऑफ नेशनचे सर्वेक्षण

**नवी दिल्ली । वृत्तसंस्था**

**आगामी सार्वत्रिक निवडणुकीत भाजपच्या नेतृत्वाखालील एनडीए आघाडी विजयी होईल. तसेच पंतप्रधान म्हणून नरेंद्र मोदी यांनाच पहायचे आहे, असे मत देशातील ६४ टक्के लोकांनी व्यक्त केले आहे. डेलीहंट ट्रस्ट ऑफ नेशनच्या सर्वेक्षणात ही माहिती समोर आली आहे.**



डेलीहंटने ११ भाषांमध्ये केलेल्या लोकसभा निवडणूक २०२४ च्या सर्वेक्षणात एकूण ७७ लाख लोकांचा सहभाग नोंदवून त्यांचे मत जाणून घेतले. सध्याच्या सरकारच्या कामावर जनता किती समाधानी आहे हे जाणून घेणे हाही या सर्वेक्षणाचा उद्देश होता. सर्वेक्षणाचे जे निकाल समोर आले आहेत ते सध्या मोदी सरकारच्या ◀◀ पान २ वर

# अखेर पक्ष फुटीला 'लोक' मान्यता नाहीच!

## ● ओपिनियन पोलने घातले राजकारण्यांच्या डोळ्यात अंजन?

**मुंबई । प्रतिनिधी**

भाजपने सत्ता मिळवण्यासाठी राज्यात शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस फोडून जे काही राजकारणाची पातळी गाठली ती जनतेला पसंत पडली नाही. लोकसभा निवडणुकीत महायुतीचे मिशन ४५ अडचणीत येण्याची शक्यता असून पक्ष फुटीला लोक मान्यता नसल्याचे ओपिनियन पोलवरुन दिसत आहे. या सर्व्हेने राजकारण्यांच्या डोळ्यात अंजन घातले असल्याचे दिसते. महायुती ३० तर महाविकास आघाडीला १८ जागा मिळण्याची शक्यता आहे. ◀◀ पान २ वर

### कोणत्या पक्षाला किती जागा?

**सर्व्हेचा अंदाज काय?**
महायुती –३०, महाविकास आघाडी– १८ , एकूण = ४८

| भाजप | शिवसेना | शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) | राष्ट्रवादी (शरद पवार) | काँग्रेस | राष्ट्रवादी (अजित पवार) |
|---|---|---|---|---|---|
| भाजप–२१/२२ | शिवसेना –९/१० | शिवसेना–९ | राष्ट्रवादी (शरद पवार) –५ | काँग्रेस –३ | राष्ट्रवादी (अजित पवार ) = ०० |

### पुन्हा एकदा मोदी सरकार

यंदा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अब की बार ४०० पारचा नारा दिला आहे. तर भाजपला ३७० जागा देण्याचे आवाहन त्यांनी केले आहे. पण टीव्ही ९ च्या ओपिनियन पोलनुसार एनडीएला देशात एकूण ५४३ जागांपैकी एनडीएला देशात ३६२ जागा मिळण्याची शक्यता आहे. त्यापैकी भाजपला ३१९ जागा मिळू शकतात. मित्रपक्षाला ४३ जागा मिळू शकतात. सर्वेक्षणानुसार इंडिया आघाडीला १४९ जागा मिळू शकतात. त्यापैकी काँग्रेसला ४९ जागा मिळू शकतात आणि आघाडीमध्ये समाविष्ट असलेल्या पक्षांना १०० जागा मिळू शकतात. याशिवाय ३२ जागा इतरांना जाऊ शकतात.

### अजित पवारांना सर्वात मोठा धक्का

शरद पवार यांची साथ सोडून राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष ताब्यात घेणाऱ्या अजित पवार यांना लोकसभा निवडणुकीत किती जागा मिळणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. मात्र, एबीपी माझाच्या ओपिनियन पोलनुसार लोकसभा निवडणुकीत अजित पवार गटाला भोपळाही फोडता येणार नाही. बारामती, शिरुर, रायगड आणि धाराशिव या चारही मतदारसंघांमध्ये अजित पवार गटाचा पराभव होण्याचा अंदाज आहे. बारातमतीमध्ये सुनेत्रा पवार आणि रायगडमध्ये सुनील तटकरेंचा पराभव अजित पवार यांच्यासाठी मोठा धक्का असू शकतो.

### सुप्रिया सुळे बारामती राखतील

राज्यातील सर्वात प्रतिष्ठेची लढत म्हणून पाहिल्या जाणाऱ्या बारामती लोकसभेची निवडणुकीत एबीपी माझा–सी व्होटरच्या ओपिनियन पोलनुसार सुप्रिया सुळे आघाडीवर आहेत. याठिकाणी सुनेत्रा पवार पिछाडीवर दिसत आहेत. हे अजित पवार यांच्यासाठी धाकधूक वाढवणारी बाब आहे.

### या जागांवर जिंकतील महायुतीचे उमेदवार

अकोला, अमरावती,बीड, भंडारा–गोंदिया, चंद्रपूर, धुळे, दिंडोरी, जळगाव, जालना, कल्याण, कोल्हापूर, लातूर, मावळ, मुंबई उत्तर–मध्य, मुंबई उत्तर–पूर्व, मुंबई उत्तर–पश्चिम, मुंबई उत्तर, मुंबई दक्षिण–मध्य, मुंबई दक्षिण, नागपूर, नाशिक, पालघर, पुणे, रामटेक, रत्नागिरी–सिंधुदुर्ग, रावेर, सांगली, सोलापूर, ठाणे आणि वर्धा या जागांवर महायुतीचे उमेदवार आघाडीवर राहतील, असे सर्वेक्षणातील आकडेवारीवरुन समोर आले आहे.

### उत्तर प्रदेशमध्ये पुन्हा भाजपचे वर्चस्व

उत्तर प्रदेशात लोकसभेच्या ८० पैकी ६८ जागा मिळताना दिसत आहेत. तर इंडिया आघाडीला येथे केवळ १२ जागा मिळतील, असे सर्वेक्षणातून समोर आले आहे. सर्वात महत्त्वाचे म्हणजे या ६८ जागांपैकी ६४ जागा भाजपच्या, दोन जागा आरएलडी आणि एडीएएलएस २ जागा जिंकताना दिसत आहे.

## ओबीसींसाठी शेवटच्या क्षणापर्यंत लढणार–ॲड. सुभाष राऊत

**बीड । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्यातील ओबीसीच्या आरक्षणावर अतिक्रमण आल्यास ते कदापि सहन करणार नाही. ओबीसीचे राष्ट्रीय नेते छगनरावजी भुजबळ साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली आयुष्याच्या शेवटच्या क्षणापर्यंत ओबीसी समाजाच्या प्रश्नासाठी लढत राहणार असल्याचे प्रतिपादन अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेचे राज्य उपाध्यक्ष तथा बीड जिल्हाध्यक्ष ॲड. सुभाष राऊत यांनी केले आहे.



गेल्या दहा दिवसापासून बीड जिल्ह्यातील विविध तालुक्यांमध्ये ◀◀ पान २ वर

## उदयनराजे भोसले यांना अखेर भाजपाकडून उमेदवारी जाहिर

**मुंबई । प्रतिनिधी**

सातारा लोकसभा मतदारसंघातून अखेर उदयनराजे भोसले यांना भाजपाने उमेदवारी जाहिर केली. विशेष म्हणजे सातारा लोकसभा निवडणूकीसाठी यापूर्वी कधीही उदयनराजे भोसले यांना किंवा त्या घराण्याशी संबधित व्यक्तीला आतापर्यंत निवडणूकीतील उमेदवारीसाठी ताटकळत ठेवले नव्हते. परंतु यंदाच्या लोकसभा निवडणूकीसाठी उदयनराजे भोसले यांना भाजपाने बराचकाळ ताटकळत ठेवण्यात आल्याची चर्चा राज्याच्या राजकिय वर्तुळात सुरु झाली आहे.



उदयनराजे भोसले यांनी २०१९ च्या निवडणूकीनंतर शरद पवार यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादी काँग्रेसच्या सातारा लोकसभा सदस्यत्वाचा राजीनामा दिला. त्यानंतर उदयनराजे भोसले यांनी रितसर भाजपात प्रवेश केला. त्यामुळे उदयनराजे भोसले यांना भाजपाने राज्यसभेवर खासदार म्हणून पाठविले. ◀◀ पान २ वर

## दादासाहेब मुंडे यांच्या हातात पुन्हा पंजा

### खा.रजनी पाटील यांनी सत्कार करून दिला प्रवेश



**बीड। प्रतिनिधी**

काँग्रेस विचार धारेवर काम करणारे दादासाहेब मुंडे याना काँग्रेस मध्ये पुन्हा सन्मानाने आगमन झाले असून यामुळे अहोरात्र मेहनत घेणाऱ्या नेतृत्वाला अधिकृत अधिकार परत मिळाले आहेत. काँग्रेस पक्षाचे सक्रिय कार्यकर्ते असलेले दादासाहेब मुंडे गेल्या तीन वर्षापासून काँग्रेस पक्षातून निलंबित होते आज अखेर बीड जिल्ह्याच्या काँग्रेस पक्षाच्या ज्येष्ठ नेत्या खासदार रजनीताई पाटील व माजी मंत्री अशोक दादा पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली व केज चे माजी नगराध्यक्ष युवा नेते आदित्य पाटील जिल्हाध्यक्ष राजेसाहेब देशमुख उपाध्यक्ष राहुल सोनवणे यांच्या उपस्थितीमध्ये त्यांच्यावर ◀◀ पान २ वर

## यूपीएससी निकालात मुलांचा झेंडा

**नवी दिल्ली । वृत्तसंस्थत्त**

केंद्रीय लोकसेवा आयोगाचे निकाल जाहीर झाले असून आदित्य श्रीवास्तव देशात पहिला तर अनिमेश प्रधान देशात दुसरा आला आहे. गेल्या दोन परीक्षांमध्ये यूपीएससीचे पहिले तीन क्रमांक मुलींनीच पटकावल्याचे दिसून आले होते. यंदा मात्र मुलांनी बाजी मारली आहे. देशात तिसऱ्या क्रमांकावर डोनुरू अनन्या रेड्डी आहे. २०२३ मध्ये केंद्रीय लोकसेवा आयोगाने घेतलेल्या परीक्षांचे हे निकाल असून upsconline.nic.in आणि upsc.gov.ळप या संकेतस्थळांवर सविस्तर निकाल पाहाता येईल. ◀◀ पान २ वर

सत्यमेव जयते UPSC

### बाजारभाव

**कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड,दि.१६ एप्रिल २०२३**

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| शेतमाल (आवक) | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू : ३२.५० क्विंटल | २,३२१ | ३,२२१ | २,८६० |
| ज्वारी/हायब्रिड : १९२.०० क्विंटल | १,८०० | ३,६५१ | २,७०३ |
| मूग : ०.५० क्विंटल | ९,८५० | ९,८५० | ९,८५० |
| तूर : १४.०० क्विंटल | ३,७०१ | १०,६०० | ९,०३० |
| उडीद : १.५० क्विंटल | ५,००० | ६,५०१ | ५,७५० |
| बाजरी: १६.०० क्विंटल | २,३१० | २,६१३ | २,४६१ |
| चिंचोका/लोकल: ८.०० क्विंटल | २,४०० | २,४०० | २,४०० |
| सोयाबीन: २१४.०० क्विंटल | ४,३३० | ४,७११ | ४,६५२ |
| हरभरा: १.५० क्विंटल | ५,५५० | ५,६०० | ५,५७५ |

# आम्ही सार्वजनिकरीत्या माफी मागण्यास तयार!

## योग गुरू बाबा रामदेव, आचार्य बाळकृष्ण यांचा सुप्रीम कोर्टात माफीनामा

**नवी दिल्ली । वृत्तसंस्था**

**बाबा रामदेव यांच्या पतंजलीच्या दिशाभूल करणाऱ्या जाहिरातींबाबत मंगळवारी पुन्हा एकदा सुप्रीम कोर्टात सुनावणी झाली. माफीनाम्याबाबत सुरू असलेल्या सुनावणीसाठी बाबा रामदेव आणि आचार्य बाळकृष्ण हे दोघेही कोर्टात हजर होते. या दोघांनीही सुप्रीम कोर्टाची माफी मागितली.**

पतंजली प्रकरणातील या माफीचा अद्याप स्वीकार केला नसल्याचे सुनावणीनंतर कोर्टाकडून सांगण्यात आले आहे. तुम्ही आणखी काही बाबी दाखल करणार होतात, त्याचे काय झाले? असा प्रश्न बाबा रामदेव यांना कोर्टाने विचारला. त्यावर रामदेव यांच्यावतीने मुकुल रोहितगी यांनी उत्तर देत म्हटले की, आम्ही अद्याप नवीन काही दाखल केलेले नसून आम्ही सार्वजनिकरीत्या माफी मागू इच्छितो. सुप्रीम कोर्टाच्या आदेशाचे उल्लंघन केल्याप्रकरणी बाबा रामदेव आणि आचार्य बाळकृष्ण यांनी वृत्तपत्रांच्या माध्यमातून सार्वजनिक माफी मागण्यास तयार असल्याचे सांगितले आहे. सुप्रीम कोर्टात झालेल्या सुनावणीदरम्यान न्यायाधीशांनी बाबा रामदेव आणि आचार्य बाळकृष्ण यांना काही प्रश्न विचारले. तुम्ही प्रसिद्ध आहात. योग क्षेत्रात तुमचे मोठे कामही आहे. नंतर तुम्ही व्यवसायही करू लागतात. तुम्हाला आम्ही माफी का द्यायला हवी? असा प्रश्न न्यायाधीश कोहली यांनी बाबा रामदेव यांना विचारला. कोर्टाने विचारलेल्या प्रश्नावर उत्तर देताना बाबा रामदेव यांनी म्हटले की, यापुढे आम्ही सतर्क राहू. कोट्यवधी लोग माझ्यासोबत जोडले गेले आहेत, याची मला जाणीव आहे. असे बाबा रामदेव म्हणाले.





### न्यायालयाकडून कठोर शब्दांत तंबी

कोर्टाने रामदेव यांच्यावर कठोर शब्दांत आसूड ओढत म्हटले की, तुम्ही आमच्या आदेशानंतरही हे सगळे केले आहे. कायदा सगळ्यांसाठी समान आहे. दरम्यान, याप्रकरणी पुढील सुनावणी २३ एप्रिल रोजी होणार असून कोर्टाने बाबा रामदेव आणि आचार्य बाळकृष्ण या दोघांनाही पुढील सुनावणीस हजर राहण्याचे आदेश दिले आहेत.

cmyk

## अग्रलेख

# महागाई कमी चे उत्तर नकारार्थीच !

नुकताच आंतरराष्ट्रीय कामगार संघटनेचा एक अहवाल समोर आला आहे. त्यात भारतातील महागाई आणि बेरोजगारीच्या मुद्यावर चिंता व्यक्त करण्यात आली आहे. एका सर्वेक्षणानुसार देशात महागाई २३ टक्क्यांनी वाढली आहे तर २७ टक्के तरुण बेरोजगारांची वणवण सुरू आहे. त्यामुळे लोकसभा निवडणुकीत महागाई आणि बेरोजगारी कळीचे मुद्दे ठरणार आहेत. त्यानंतर विकास, हिंदुत्व, राममंदिर यासारख्या गोष्टी लक्षात घेतल्या जातील. महागाई आणि बेरोजगारीच्या मुद्यावर नागरिकांनी मत देताना विचार केला तर भाजप अडचणीत येऊ शकतो. विकास या मुद्याचा भाजपला फायदा होऊ शकतो तसेच हिंदुत्वामुळे २ टक्के तर राम मंदिर मुद्याचा ८ टक्के फायदा होऊ शकतो. सर्वेक्षणात पुढे म्हटले आहे की, देशातील तरुण लोकसंख्येवर बेरोजगारीचा लक्षणीय परिणाम होत आहे.

यंदाच्या निवडणुकीत बेरोजगारी, महागाई आणि विकास हे तीन मुद्दे महत्त्वाचे ठरणार आहेत. बेरोजगारी व महागाई हे मुद्दे भाजपला छळणारे ठरतील. नागरिकांना 'विकास' महत्त्वाचा वाटतो. यासाठी भाजपला मतदान मिळू शकते. ग्रामीण भागात मात्र बेरोजगारी व महागाईची भीषण स्थिती आहे. देशात मोठ्या प्रमाणात बेरोजगारी वाढत चालली आहे. गत विधानसभा निवडणुकीत हा महत्त्वाचा विषय होता. अनेक तरुण नोकरीसाठी वणवण भटकत असून त्यांना मनासारखे काम मिळत नाही. मोदींनी निवडणूक प्रचारात या मुद्याकडे दुर्लक्षच केले आहे. त्यांचा भर प्रामुख्याने विकास मुद्यावर आहे. ३२ टक्के लोकांना विकास हा केवळ श्रीमंतांसाठी झाला असे वाटते. सर्वेक्षणातून अनेक बाबी स्पष्ट झाल्या आहेत. मोदी सरकारच्या काळात गत पाच वर्षात भ्रष्टाचार बोकाळल्याचे मत बहुसंख्य नागरिकांनी व्यक्त केले आहे. किमान आधारभूत किमतीच्या हमीबाबत शेतकऱ्यांनी जे आंदोलन सुरू केले आहे ते योग्य असल्याचे मत ६३ टक्के लोकांनी व्यक्त केले आहे तर ११ टक्के लोकांनी हे आंदोलन म्हणजे षडयंत्र असल्याचे म्हटले आहे. यंदा देशात झालेल्या अपुऱ्या पावसामुळे डाळींचे उत्पादन घटले. त्यामुळे एप्रिल महिन्यात डाळींचे भाव गगनाला भिडले. सर्वसामान्यांच्या जेवणातून डाळ गायब होण्याची वेळ आली. राज्यात मार्च महिन्यापासून डाळीचे भाव वाढत आहेत. मार्च महिन्यात तूर डाळीचे घाऊक बाजारातील दर १२० ते १४० रुपये होते. ते आता १४० ते १७० रुपये झाले आहेत. किरकोळ बाजारात हा दर १४० रूपयांवरून १७० ते १९० रुपये प्रतिकिलो झाला आहे. शंभरीच्या आत असलेली मूग डाळ १४० च्या घरात गेली आहे. सरकारने शुक्रवारी किरकोळ महागाईचे दर जाहीर केले. त्यानुसार किरकोळ महागाईचा दर ४.८५ टक्के दाखवण्यात आला आहे. गत दहा महिन्यातील हा निचांक असल्याचे सांगण्यात येते. ही झाली सरकारी आकडेवारी पण प्रत्यक्षात काय? खरचं महागाई कमी झाली का? या प्रश्नाचे उत्तर नकारार्थीच असेल. बाजारात गेल्यानंतर जीवनावश्यक वस्तूंचे दर मोठ्या प्रमाणात वाढलेले दिसतील. माणसाच्या मूलभूत गरजांपैकी असलेल्या अन्न, वस्त्र, निवाऱ्यापैकी अन्नधान्याची महागाई वाढलेली आहे. तांदूळ, तूरडाळ, मूगडाळ, उडीद डाळ, मसाल्याचे पदार्थ आदींच्या दरात मोठी वाढ झाली आहे. भाज्यांचे दरही ८० ते १०० रुपये किलोपर्यंत पोहोचले आहेत. त्यामुळे किचन बजेट कोलमडले आहे. अन्नधान्य, वाहतुकीचा वाढता खर्च, जीवनावश्यक वस्तूंच्या महागाईमुळे प्रत्येकजण मेटाकुटीला आला आहे. जमा व खर्चाची तोंड मिळवणी करताना नाकीनऊ येत आहेत. पैसे कुठे वाचवले जाऊ शकतात हे पाहताना मध्यम वर्गीयांच्या तोंडचे पाणी पळाले आहे.



## डॉ.बीआर आंबेडकर सेंट्रल लायब्ररी बीड आणि भारतीय धम्म महासंघ बीड यांच्या संयुक्त विद्यमाने डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्त विनम्र अभिवादन

**बीड । प्रतिनिधी**

डॉ.बीआर आंबेडकर सेंट्रल लायब्ररी बीड व भारतीय धम्म महासंघ, बीड यांच्या संयुक्त विद्यमाने प.पु. विश्व रत्न बोधीसत्व डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची १३३ वी जयंती डॉ बी आर आंबेडकर सेंट्रल लायब्ररी बीड येथे अत्यंत उत्साहात साजरी करण्यात आली. प्रसंगी प.पु. विश्व रत्न, बोधीसत्व डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमे समोर मोमबत्ती अगरबत्ती प्रज्वलित करून व पुष्पहार अर्पण करून आयु डॉ अशोक मजमुले सर आणि आयु बंडु शेट्टे साहेब यांनी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस विनम्र अभिवादन केले. आयु डी एस आठवले यांनी सामुहिक वंदना घेतली. जयंती निमित्ताने आयु सतीश कापसे साहेब, बी आर गायकवाड आणि एस एम जोगदंड यांनी विश्व रत्न बोधीसत्व डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्यकर्तृत्व विषयी समयोचित मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे शेवटी आयु सूरेश कांबळे यांनी उपस्थितांचे आभार व्यक्त करून कार्यक्रम संपल्याचे जाहीर केले. जयंती दिनानिमित्त डॉ अशोक मजमुले सर, सतीश कापसे सर, बी आर गायकवाड, एस एम जोगदंड, डी एस आठवले, पी एस वडमारे, सुनील जाधव, सुरेश कांबळे, बंडु शेट्टे व आजीनाथ माने साहेब यांनी उपस्थित राहून विनम्र अभिवादन केले.

## आजपासुन युसूफवडगांव येथे श्रीराम नवमी जन्मोत्सव व भव्य यात्रा महोत्सवास सुरुवात

**युसूफवडगांव । प्रतिनिधी**

**केज तालुक्यातील युसूफवडगांव येथील गावचे ग्रामदैवत असलेले प्रभू श्रीराम यांच्या श्रीराम नवमी जन्मोत्सावाच्या निमित्ताने गावामध्ये विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून सोबतच ३ दिवसांचा भव्ययात्रा महोत्सव आयोजिन करण्यात आलेला आहे.**



युसूफवडगांव येथे अतिशय पुरातन श्रीराम मंदिर असुन अंदाजे येथे ३००/३५० वर्षापासुन श्रीराम नवमी जन्मोत्सव सोहळा व यात्रा महोत्सवाची परंपरा असुन या हि वर्षी श्रीराम नवमी जन्मोत्सव सोहळा व भव्य यात्रा महोत्सव असुन याची सुरुवात दि.१७ एप्रिल पासुन होणार आहे.या दिवशी दु.१२ वा.रामजन्म सोहळा तद्नंतर मंदिरातुन पालखी सोहळा सुरू होईल. तर दु.२ मानाच्या १२ बैलगाड्या ओढण्याचा कार्यक्रम संपन्न होईल.१८ एप्रिलला रात्री ठिक १२ वा मंदिरातुन छबिना मिरवणूक सुरूवात होईल छबिना मिरवणुक हनुमान मंदिरासमोर विसावल्यावर या ठिकाणी पहाटे ५ वा. पारंपारिक भारूडाचा कार्यक्रम व शोभेची दारु उडवण्याचा कार्यक्रम होईल दि.१९ एप्रिलला दु.३ वा आमराई मध्ये भव्य कुस्ती स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे तसेच १७ एप्रिलला स्नेहा पिंपरीकर पुणे यांचा लावण्यवती ऑर्केस्ट्राचा कार्यक्रम पण होणार आहे.तरी सर्व भाविकभक्तांनी श्रीराम नवमी जन्मोत्सव व भव्य यात्रा महोत्सवामध्ये सहभागी होण्याचे आवाहन सरपंच,उपसरपंच,सर्व ग्रा.प.सदस्य व समस्त ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आले आहे.

## सन्मानजनक मताधिक्यासाठी परिश्रम घ्या-खा.प्रितमताई मुंडे

### बीड तालुक्यातील मतदारांच्या प्रितमताई मुंडे यांनी घेतल्या भेटी

**बीड । प्रतिनिधी**

**बीड जिल्ह्याच्या पालकमंत्री पदाची जवाबदारी सांभाळत असताना पंकजाताई मुंडे यांनी अभूतपूर्व विकास निधी आणला होता, तेंव्हापासून आजपर्यंत केलेली लोकाभिमुख विकासकामे हीच पंकजाताईंच्या विजयाची नांदी ठरणार आहेत, पंकजाताईंचा विजय त्यांनी केलेल्या विकासकामांमुळे निश्‍चित आहे. या विजयात पंकजाताईंच्या उंचीला शोभेल असे मताधिक्य देऊन पंकजाताईंना सन्मानजनक विजय मिळवून देण्यासाठी परिश्रम घ्या असे आवाहन खा.प्रितमताई मुंडे मांजरसुंभा,लिंबा गणेश, ढेकनमोहा गणातील पदाधिकारी, कार्यकर्त्यांना केले.**



भाजप आणि महायुतीच्या उमेदवार पंकजाताई मुंडे यांच्या प्रचारासाठी मांजरसुंभा, लिंबा गणेश,ढेकनमोहा पंचायत समिती गणातील बूथप्रमुख, शक्तीकेंद्र प्रमुख, पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांची बैठक संपन्न झाली. या बैठकीला संबोधित करताना खा.प्रितमताई मुंडे बोलत होत्या. भाजपचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के, योगेश क्षीरसागर, शिवसेनेचे अनिल जगताप, सचिन मुळूक यांच्यासह महायुतीचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते याप्रसंगी उपस्थित होते. लोकसभेची निवडणूक आपण विकास कामांच्या बळावर आणि भविष्याच व्हिजन घेऊन लढवत आहोत, यापूर्वी पंकजाताईंच्या नेतृत्वात आपण बीड जिल्ह्यात अभूतपूर्व विकासकामे केली आहेत. आपण केलेला विकास हाच आपला विजय आहे. विकास ही निरंतर चालणारी प्रक्रिया आहे, काही कामे प्रलंबित राहिली असतील तर आपण केंद्र आणि राज्य सरकारच्या माध्यमातून मार्गी लावू, याकरिता केंद्रात आणि राज्यात सत्ता असलेला खासदार आपल्याला प्रतिनिधी म्हणून निवडायचा आहे. आपल्या भागातील प्रत्येक व्यक्तीपर्यंत आपण केलेली विकास कामे पोहोचवा, प्रत्येक गावात प्रचारफेरी काढा, आपल्या बूथवर मागील मताधिक्यापेक्षा अधिक मतदान पंकजाताईंना मिळेल यासाठी मेहनत घ्या असे आवाहन याप्रसंगी खा.प्रितमताई मुंडे यांनी केले. दरम्यान बीड तालुक्यातील बोरफडी,जुजगव्हाण येथील सप्ताहांना भेटी देऊन त्यांनी ग्रामस्थांशी संवाद साधला. तसेच मौज आणि जरुड आणि बीड शहरातील मतदारांच्या भेटी घेऊन पंकजाताई मुंडे यांना अधिकाधिक मताधिक्य देण्याचे आवाहन खा. प्रितमताई मुंडे यांनी केले. भाजप नेते सर्जेराव तांदळे, नवनाथ शिराळे,देविदास नागरगोजे,चंद्रकांत फड, सलीम जहांगीर,अजय सवाई, संग्राम बांगर यांच्यासह कार्यकर्ते यावेळी उपस्थित होते.

# नामनिर्देशन पत्र अर्ज सजगतेसह नियमानुसार परिपूर्ण भरा–जिल्हादंडाधिकारी

**बीड । प्रतिनिधी**

**लोकसभा सार्वत्रिक निवडणुका सुरू असून ३९ बीड लोकसभा मतदारसंघात चौथ्या टप्प्यात सोमवार दिनांक १३ मे रोजी मतदान होणार असून यासाठी उमेदवाराकडून नामनिर्देशन पत्र भरण्याची प्रक्रिया गुरुवार दिनांक १८ एप्रिल पासून सुरुवात होणार आहे हे नामनिर्देशन अर्ज उमेदवाराने सजगतेने तसेच परिपूर्ण भरावे अशा सूचना, जिल्हादंडाधिकारी आणि दीपा मुधोळ मुंडे यांनी आज झालेल्या पत्रकार परिषदेत केले.**

आज नियोजन सभागृहात सर्व राजकीय पक्षांची बैठक बोलविण्यात आली असून या बैठकीदरम्यान जिल्हादंडाधिकारी यांनी सूचना केल्या. याप्रसंगी निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी, उपजिल्हा निवडणूक अधिकारी महेंद्र कुमार कांबळे उपस्थित होते. जिल्हा निर्णय निवडणूक अधिकारी पुढे म्हणाल्या, १८ एप्रिल रोजी निवडणुकीची अधिसूचना प्रसिद्ध होणार आहे. याच दिवसापासून ११ ते ३ पर्यंत दिनांक २५ एप्रिल पर्यंत जिल्हाधिकारी यांच्या कार्यालयात हे नामनिर्देशन पत्र स्वीकारले जातील. अनुसूचित जाती तथा जमातीच्या उमेदवारासाठी १२.५०० हजार रुपये अनामत रक्कम आहे तर सामान्य वर्गातील सदस्यांसाठी २५००० रुपये अनामत रक्कम आहे. अनामत रक्कम जमा करून नामनिर्देशन पत्र दाखल केल्यानंतर जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी यांच्यापुढे शपथ घेणे आवश्यक असल्याचे माहिती त्यांनी यावेळी दिली. नामनिर्देशन पत्रासोबत शपथ पत्र नमुना २६ हा देखील सादर करणे आहे याची वेळ २५ एप्रिल रोजी तीन वाजेपर्यंत असणार आहे. शपथ पत्र अपूर्ण असल्यास दुसरे शपथ पत्र सादर करण्याची दिनांक २६ एप्रिल सकाळी ११ वाजे पासून असणार आहे. याच दिवशी मतदार यादीची प्रमाणित पत्र दाखल करावी लागणार आहे. फॉर्म ए व फॉर्म बी २५ एप्रिल दुपारी तीन वाजेपर्यंत सादर करणे आहे. नामनिर्देशन पत्राची छाननी करण्याची तारीख २६ एप्रिल सकाळी ११ वाजेपासून सुरू होईल. नामनिर्देशन मागे घेण्याची अंतिम तारीख



२९ एप्रिल सायंकाळी तीन वाजेपर्यंत असणार आहे. नामनिर्देशन अर्जात नमूद केलेल्या पक्षानुसार चिन्ह वाटप केले जाईल त्यासह जे उमेदवार अपक्षरीत्या उभे होतील त्यांनाही स्वतंत्र चिन्ह दिले जाईल. उमेदवार त्यांचे नामनिर्देशन हे निवडणूक आयोगाच्या सुविधा वेब पोर्टल दिलेले आहे याद्वारे देखील ऑनलाइन पद्धतीने नामनिर्देशन पत्र दाखल केल्यावर त्याची एक प्रत जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडे प्रत्यक्ष देण्यात यावी, असेही यावेळी सांगितले. यापूर्वी बँकेच्या प्रतिनिधी सोबत झालेल्या बैठकीत निवडणुकीसाठी उभे असलेले उमेदवारांना नवीन बँक खाते उघडाण्याबाबत निर्देश देण्यात आल्याची माहिती त्यांनी यावेळी दिली. हे बँक खाते नामनिर्देशन पत्र दाखल करण्याच्या दोन दिवसाआधी उडावे लागते. प्रत्येक उमेदवाराला ९५ लाख रुपये खर्चाची मर्यादा असून होणारा सर्व खर्च या नवीन उघडलेल्या बँक खात्यात दाखवावे लागतात. नामनिर्देशन पत्रात जोडलेले छायाचित्र हे तीन महिन्यापेक्षा जुने नसावे अशी माहिती त्यांनी यावेळी दिली. उमेदवारावर काही गुन्हे असल्यास त्याची माहिती वर्तमानपत्राद्वारे देण्यात यावी व त्याची प्रत ही जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडे द्यावी अशी ही माहिती त्यांनी यावेळी दिली. अपक्ष उमेदवारासाठी १० सूचक हवे असतात ज्यांची उमेदवारी ही त्याच मतदारसंघातली असावी. राजकीय पक्षांनी उभे केलेले उमेदवार यांचे खर्च चा ताळमेळ ठेवण्यासाठी इलेक्शन एजंट आणि एक्सपेंडिचर एजंट असे नेमावे आणि वेळोवेळी झालेला खर्च हा निवडणूक आयोगाकडून मिळालेल्या नोंदवहीत नोंदवण्यात यावा याबाबतची प्रशिक्षण देण्यात येणार आहे. जेणेकरून त्या त्यावेळी झालेला खर्च हा त्या त्या खात्यात देण्यात येईल अशी ही माहिती यावेळी जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी यांनी दिली. मुद्रित, इलेक्ट्रॉनिक आण समाज माध्यमांसाठी उमेदवारांनी दिलेल्या जाहिराती या माध्यम प्रमाणिकरण व सनियंत्रण समितीकडून प्रमाणित करून प्रसारित करणे गरजेचे आहे. उमेदवारांनी त्यांचे सामाजिक माध्यमे जसे फेसबुक इन्स्टाग्राम ट्विटर अन्य काही असल्यास त्याची माहिती नामनिर्देशन पत्रात द्यावी व्यक्तिगतरीत्या स्वतःचा प्रचार करण्यास उमेदवारांना मुभा असून त्यांच्यावतीने इतरांनी प्रचार केल्यास त्याचा खर्च हा उमेदवाराच्या खर्चात जमा करण्यात येईल. लोकप्रतिनिधित्व अधिनियम १९५१ च्या कलम ७७ अन्वे स्टार प्रचारक म्हणून ओळखले जाणारे राजकीय पक्षाच्या लोकप्रिय नेत्यावर झालेल्या खर्चाची संबंधित कायद्याची तरतूद करण्यात आलेली आहे त्याप्रमाणे कारवाई केली जाईल याची दक्षता राजकीय पक्षांनी घ्यावी, असे यावेळी सांगितले. एकूण बीड जिल्ह्यासाठी घेण्यात येणाऱ्या परवानग्या या सहाय्यक निर्णय निवडणूक अधिकारी बीड यांच्याकडून मिळतील तर त्या त्या विधानसभा मतदारसंघातील परवानगी या त्या विधानसभा मतदारसंघातील सहाय्यक निर्णय निवडणूक अधिकारी यांच्याकडून दिल्या जातील अशी ही माहिती यावेळी देण्यात आली. बीड जिल्ह्यातील नामनिर्देशन पत्र संदर्भातली कारवाई निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी हे करतील तर टपाली मतदाना संदर्भातली कारवाई उपजिल्हाधिकारी शैलेश सूर्यवंशी हे करतील अशी ही माहिती यावेळी देण्यात आली.

## पान १वरून...

### पंतप्रधान म्हणून ६४ टक्के

बाजूने आहेत. ६१ टक्के लोकांनी पीएम मोदींच्या कामावर समाधान व्यक्त केले आहे. यावेळीही लोकसभा निवडणुकीत एनडीएला बहुमत मिळेल असा ६३ टक्के लोकांचा विश्वास असल्याचेही या सर्वेक्षणातून समोर आले आहे. सर्वेक्षणातील पाचपैकी तीन जणांनी नरेंद्र मोदी हेच पंतप्रधान होतील असे म्हटले आहे. २१.८ टक्के लोकांना राहुल गांधी पंतप्रधान व्हावेत असे वाटते.

-----------

### मतदान करायचे की नाही, हे

आहे. आता आम्ही ठरवू कोणाला मत द्यायचे. असे शेतकरी बोलून दाखवत आहेत. शेतकरी गेल्या अनेक दशकांपासून आर्थिक झळा सोसत आहे. कांदा पीक घेण्यासाठी पूरक घटकांच्या किंमतीत १० पट वाढ झाली आहे त्या प्रमाणात कांदा दर कधीही मिळत नाही. उलट मूळ प्रश्नांना बगल देण्यासाठी देशाचे लक्ष कांद्यावर केंद्रित केले जाते आणि इतर वाढत असलेली महागाई दुर्लक्षित केली जाते. जसे की गॅस, पेट्रोल, डिझेल, खाद्य तेल, आरोग्य आणि शिक्षण महागाई याकडे लक्ष न देता कांदा विषय पुढं आणून राजकारण केले जाते. या अशा राजकीय खेळीला आता सर्व शेतकरी वैतागले आहेत. यामुळेच त्यांनी राजकारण्यांना विरोध केला आहे. याप्रसंगी सरपंच मयूर बागुल, खुशाल बागुल, किशोर बागुल, दिलीप शेवाळे, शशी शेवाळे, नाना सोनवणे, प्रतीक बागुल, जीभाऊ शेवाळे, अमोल बागुल, आबा गुंजाळ, राहुल बागुल, विशाल बागुल, गणू बागुल, अनिल जाधव, महेंद्र बागुल, मोहित वाघ, रमेश बागुल, प्रशांत बच्छाव, साहेबराव बागुल, रमेश बागुल, प्रवीण बागुल, विनोद आहेर, महेश बच्छाव, राजेंद्र बच्छाव, तात्या भदाणे, विठ्ठल पाटील, आदींसह शेतकरी उपस्थित होते.

--------------

### अखेर पक्ष फुटीला 'लोक'

महाराष्ट्रात गेल्या अडीच वर्षांमध्ये प्रचंड मोठ्या घडामोडी घडल्या आहेत. महाराष्ट्रात २०१९ च्या विधानसभा निवडणुकीनंतर शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस आणि काँग्रेस या तीन पक्षांच्या महाविकास आघाडीचे सरकार स्थापन झाले. कोरोनाच्या दोन वर्षाच्या संकटानंतर काही महिन्यांनी हे सरकार एकनाथ शिंदे यांच्या बंडामुळे कोसळले. पुन्हा सहा महिन्यांने अजित पवारांच्या रुपात राष्ट्रवादी काँग्रेस फुटली. ठाकरे आणि शरद पवार यांच्या हातातून पक्ष आणि चिन्हही गेले. या घडामोडी उभा महाराष्ट्र उघड्या डोळ्याने पाहत होता. सध्या लोकसभा निवडणुक होऊ घातली आहे. मतदानाच्या तीन दिवस आधी ९ चा सर्वात मोठा ओपिनियन पोल समोर आला आहे. या ओपिनियन पोलची आकडेवारी महाराष्ट्राच्या राजकारण्यांच्या डोळ्यांमध्ये अंजन घालणारी आहे. कारण या निवडणुकीत पक्षफुटीला मान्यता नाही, असा संदेश महाराष्ट्राची जनता देण्याची शक्यता आहे. एबीपी माझा आणि सी–व्होटरने केलेल्या मतदानपूर्व चाचणीचा निष्कर्ष समोर आला आहे. कागदावर बलाढ्य मानल्या जाणाऱ्या आणि सध्या सत्तेत असलेल्या भाजप, शिंदे गट आणि अजित पवार गटाच्या महायुतीला मोठा धक्का बसण्याची शक्यता आहे. तर काँग्रेस, ठाकरे गट आणि शरद पवार गटाचा समावेश असलेल्या महाविकास आघाडीला लक्षणीय यश मिळताना दिसत आहे. एबीपी माझा आणि सी व्होटरच्या ओपिनियन पोलनुसार, महाराष्ट्रातील लोकसभेच्या एकूण ४८ जागांपैकी ३० जागांवर महायुतीचे उमेदवार विजयी होतील. तर १८ लोकसभा मतदारसंघांमध्ये महाविकास आघाडी अर्थात इंडिया आघाडीच्या उमेदवारांचा विजय होईल. बारामती, माढा, नांदेड आणि परभणी लोकसभा मतदारसंघात धक्कादायक निकाल पाहायला मिळू शकतात. त्यामुळे राज्यात जी पक्षीय फोडाफोडी झाली ती जनतेला पहावली नसल्याचे दिसते. या सर्व्हेवरुन तर पक्ष फुटीला लोक मान्यता नसल्याचे दिसत असून राजकारण्यांच्या डोळ्यात अंजन मतदारांनी अंजन घातल्याचे दिसते.

**दहा राज्यात काँग्रेस शुन्य**

हिमालच प्रदेश, उत्तराखंड, दिल्ली, पश्चिम बंगाल, गुजरात, आंध्रप्रदेश, झारखंड, छत्तीसगड, मध्यप्रदेश आणि पंजाब या दहा राज्यात काँग्रेसला आपले खातेही उघडता येत नसल्याचे दिसते.

------------

### दादासाहेब मुंडे यांच्या

केलेली निलंबनाची कारवाई मागे घेण्यात आली असून दादा मुंडे यांना पुन्हा काँग्रेस पक्षांनी स्वग्रही काम करण्याची संधी दिली आहे. बीड जिल्ह्यातील काँग्रेस पक्षाच्या संघटनात्मक बांधणीमध्ये अत्यंत सक्रिय काम करणारे दादासाहेब मुंडे यांनी आठ वर्षांपूर्वी महाराष्ट्र राज्याचे माजी महसूल मंत्री तथा विधान मंडळाचे गटनेते बाळासाहेब थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली काँग्रेस पक्षात प्रवेश केलेला होता जिल्हा नियोजन समिती सदस्य बीड हिंगोली जिल्हा काँग्रेस कमिटीचे प्रभारी तथा औरंगाबाद महानगरपालिकेच्या निवडणुकीसाठी निरीक्षक म्हणून काम केलेल्या दादासाहेब मुंडे यांना काँग्रेस पक्षाने वेगवेगळ्या पदावर काम करण्याची संधी दिलेली आहे तीन वर्षांपूर्वी दादासाहेब मुंडे यांना शिस्त भंगाच्या कारवाईला सामोरे जावे लागले होते त्यामुळे पक्षाने त्यांच्यावर तात्काळ निलंबनाची कारवाई केलेली होती गेल्या तीन वर्षांपूर्वी निलंबित केलेल्या दादा मुंडे यांनी मात्र आपले निलंबन झाल्यानंतर सुद्धा पक्षाच्या कामात स्वतःला सक्रिय ठेवले होते विशेष म्हणजे काँग्रेसचे राष्ट्रीय नेते राहुल गांधी यांच्या नेतृत्वाखाली निघालेल्या भारत जोडो यात्रेत दादा मुंडे संपूर्ण महाराष्ट्रात राज्य यात्री म्हणून सहभागी झाले होते काँग्रेस पक्षाच्या गेल्या तीन वर्षापासून जिल्ह्यातल्या व राज्यातल्या वेगवेगळ्या कार्यक्रमात त्यांनी सक्रिय सहभाग नोंदवलेला होता पक्षाने निलंबनाची कारवाई केल्यानंतर सुद्धा आपण काँग्रेस पक्षात राहण्याचा निर्णय घेतलेला असल्यामुळे इतर कोणत्याही पक्षात प्रवेश करणार नाही अशी त्यांची भूमिका होती तथापि लोकसभेच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर काँग्रेस पक्षाच्या राज्यस्तरीय नेतृत्वाशी चर्चा करून बीड जिल्ह्याच्या राष्ट्रीय नेत्या तथा राज्यसभा सदस्य खासदार रजनीताई पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली माजी मंत्री अशोकराव पाटील युवा नेते आदित्य पाटील यांच्याशी चर्चा झाल्यानंतर दादासाहेब मुंडे हा सामान्य परिवारातून आलेला व पक्षाशी एकनिष्ठपणे आसलेल्या कार्यकर्त्याला न्याय देण्याची भूमिका पाटील परिवारांनी घेतलेली आहे त्यामुळे दादासाहेब मुंडे यांच्यावर पक्षाने केलेली शिस्तभंगाची कारवाई मागे घेण्यात आली असून आज दादासाहेब मुंडे यांना खासदार रजनीताई पाटील यांनी पुन्हा काँग्रेस पक्षात पुनर्प्रवेश दिला असल्याची घोषणा केली आहे आज केज येथे त्यांच्या निवासस्थानी दादासाहेब मुंडे यांचे काँग्रेस पक्षात माजी मंत्री अशोकराव पाटील आदित्य पाटील जिल्हाध्यक्ष राजसाहेब देशमुख उपाध्यक्ष राहुल सोनवणे यांच्या उपस्थितीमध्ये त्यांचे पक्षात स्वागत करण्यात आले आहे आगामी काळात बीड जिल्हा काँग्रेस पक्षाच्या संघटनात्मक बांधणीमध्ये अधिक जोमाने व एक दिलाने काम करण्यासाठी संपूर्ण बीड जिल्ह्यातील काँग्रेस पक्षाची टीम पाटील परिवाराच्या मार्गदर्शनाखाली पक्षाला अधिक मजबूत करेल व आगामी काळात निवडणुकीच्या राजकारणामध्ये काँग्रेस पक्षाला अधिक बळकट करण्याचा प्रयत्न करण्याचा संकल्प यावेळी करण्यात आला.. दादासाहेब मुंडे यांच्या काँग्रेस पक्षात म्हणजे स्वग्रही परतण्याच्या निर्णयाचे जोरदार स्वागत करण्यात आले असून तीन वर्षापासून तांत्रिकदृष्ट्या पक्षापासून दूर असलेल्या मात्र मनाने कायम काँग्रेसमध्ये असलेल्या दादासाहेब मुंडे यांनी इतर कोणत्याही पक्षात न जाण्याचा घेतलेला निर्णय कौतुकास पात्र आहे... सर्व कार्यकर्त्यांनी अभिनंदन केले आहे..

-----------------

### उदयनराजे भोसले यांना अखे

परंतु लोकसभा निवडणूक २०२४ ची रणधुमाळी सुरु होताच पुन्हा एकदा उदयनराजे भोसले यांनी सातारातून लोकसभेसाठी भाजपाकडे संधी मागितली. मात्र सातारामधून भाजपाकडून संधी मिळण्याची शक्यता फारच कमी होती. तसेच सातारा जिल्हा शरद पवार यांचा बालेकिल्ला म्हणून ओळखला जातो. त्यामुळे शरद पवार यांच्या प्रभाव क्षेत्राखाली असलेल्या सातारा मतदारसंघ खेचून घेणे हवे तितके सोपे नाही. तरीही उदयनराजे भोसले हे सातारातून उमेदवारी मिळावी याकरिता चार दिवस दिल्लीत अमित शाह यांच्या भेटीसाठी ठाण मांडून बसले. तरीही अमित शाह यांनी उदयनराजे भोसले यांना भेटीसाठी वेळ दिली नाही. अखेर महाराष्ट्रातून भाजपा नेते देवेंद्र फडणवीस यांनीच पुन्हा दिल्लीत जाऊन उदयनराजे भोसले यांची भेट घेत त्यांना उमेदवारीचे आश्वासन दिले. त्यानंतर उदयनराजे भोसले यांनीही सातारा शहरात आगमन करताना जसे की त्यांना लोकसभेची उमेदवारी जाहिर करण्यात आलेली आहे या थाटातच प्रवेश केला. त्यानंतर १० दिवस झाले तरी त्यांना उमेदवारी जाहिर केली नाही. त्यामुळे उदयनराजे भोसले यांची राजकिय कुंचबना होत असल्याचे दिसून आले. अखेर भाजपाने मंगळवारी उत्तर प्रदेश, पंजाब मधील उमेदवारांची यादी जाहिर करत सातारा लोकसभा मतदारसंघातून उदयनराजे भोसले यांचे नावही यादीत जाहिर केले. त्यामुळे शरद पवार यांचे खंदे समर्थक तथा राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे लोकसभा उमेदवार शशिकांत शिंदे यांच्याशी त्यांची लढत होणार आहे.

**दिल्लीच्या तख्तापुढे उदयनराजे नतमस्तक – जितेंद्र आव्हाड**

महाराष्ट्राला एक परंपरा आहे. छत्रपतींची कोल्हापूरची गादी असो किंवा साताराची गादी असो. या गादीबद्दल आदर आहे. छत्रपतींच्या वंशजांनी ही गादी आचारविचाराचे पालन करुन पुढे चालवली पाहिजे. पण उदयनराजे यांची कृत्य, दुष्कृत्य साताऱ्यात आणि सगळीकडे बघितली आहेत. उदयनराजे यांचे वर्तन गादीचा सन्मान ठेवणारे असते तर ठीक होते. आपण कोणासमोर झुकत आहोत, याचा विचार उदयनराजे यांनी केला पाहिजे होता. पण ते साताऱ्यातून उमेदवारी मिळवण्यासाठी चार दिवस दिल्लीत होते. दिल्लीच्या तख्तासमोर तिकीट द्या, तिकीट द्या, असे सांगत होते. उमेदवारीसाठी उदयनराजे दिल्लीच्या तख्तापुढे नतमस्तक झाले, ही गोष्ट लोकांना फारशी आवडणार नाही, अशी बोचरी टीका राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे नेते जितेंद्र आव्हाड यांनी केली.

-----------------

### ओबीसींसाठी शेवटच्या क्षणापर्यंत

जिल्हा दौरा काढून ओबीसी समाजाच्या समस्या आणि ओबीसी समाजाचे मत जाणून घेण्याचा प्रयत्न ॲड. सुभाष राऊत यांनी केला आहे. लोकसभा निवडणुकी संदर्भात त्यांनी बीड जिल्ह्यातील ओबीसी समाज बांधवांचा कौल जाणून घेतला असून ओबीसी समाजाने कोणाच्या पाठीशी आपली ताकद उभा करावी याबाबतीत ओबीसी समाजातील विविध संघटनांचा आढावा घेतला आहे. ओबीसी समाजाचे राष्ट्रीय नेतृत्व ना. छगनरावजी भुजबळ साहेब यांच्या आदेशानुसार बीड जिल्ह्यामध्ये ओबीसी मतदारांची जनजागृती करण्याचा यशस्वी प्रयत्न गेल्या दहा दिवसांपासून आयोजित केलेल्या ओबीसी समाजाच्या जनजागृती मोहिमेतून त्यांनी केला आहे. याचबरोबर बीड जिल्ह्यातील ओबीसी समाज बांधवांनी ओबीसी समाज मेळाव्यास लाखोच्या संख्येने उपस्थिती दर्शवून ओबीसी समाजाची ताकद दाखवून दिल्याबद्दल त्यांनी सर्वांचे आभार व्यक्त केले आहेत. तसेच कुणबी ओबीसी आदेश विरोधात बीड जिल्ह्यातील हजारो नागरिकांनी आक्षेप नोंदविल्याबद्दल त्यांनी बीड जिल्ह्यातील ओबीसी समाजाचे आभार मानले आहेत. बीड जिल्ह्याच्या दौऱ्याप्रसंगी त्यांनी गावागावातील नागरिकांची मते नोंदवून घेतली असून येत्या लोकसभा निवडणुकांमध्ये काय निर्णय घ्यायचा याची बांधणी केली आहे. त्यामुळे ॲड. सुभाष राऊत यांच्यासह ओबीसी समाज काय निर्णय घेईल? यावर बीड जिल्ह्यातील लोकसभा उमेदवाराचे भवितव्य अवलंबून असल्याचे बोलले जात आहे.

-----------------

### युपीएससी निकालात

यंदा यूपीएससीच्या परीक्षांमध्ये १०१६ उमेदवार उत्तीर्ण झाले आहेत. यामध्ये ३४७ उमेदवार खुल्या प्रवर्गाचे, ११६ उमेदवार आर्थिकदृष्ट्या मागास प्रवर्गाचे, ३०३ उमेदवार ओबीसी प्रवर्गाचे, १६५ उमेदवार अनुसूचित जाती प्रवर्गाचे तर ८६ उमेदवार अनुसूचित जमाती प्रवर्गाचे आहेत. गेल्या वर्षी हेच प्रमाण खुला प्रवर्ग ३४५, आर्थिकदृष्ट्या मागास वर्ग २८, ओबीसी ५२, अनुसूचित जाती ५ तर अनुसूचित जमाती ४ असे होते.

# गटविकास अधिकाऱ्यांनी घरकुल लाभार्थ्यांची अडवणूक थांबवावी –भाई गोले

माजलगाव :- येथील पंचायत समिती कार्यालयात अंतर्गत साधारणता एक हजार सातशे घरकुल लाभार्थ्यांच्या खात्यावर बांधकाम पूर्वतयारी करण्यासाठी शासनाने १५००० रुपये प्रमाणे पैसे वर्ग केलेले असताना गटविकास अधिकारी यांनी बँकेला पत्र देऊन सदरील खात्याला स्थगित करण्याच्या सूचना केल्यामुळे लाभार्थ्यांच्या खात्याला बँकेने स्थगित केले आहे त्यामुळे एक हजार सातशे लाभार्थ्यांना घरकुलाची पूर्वतयारी करण्यासाठी तसेच बांधकामासाठी साहित्य खरेदी करण्यासाठी दिलेले पंधरा हजार रुपये बँकेने लाभार्थ्यांचे खाते होल्ड करून स्थगित केल्याने लाभार्थी पंचायत समितीसह बँकेचे उंबरठे झिजवत असताना गटविकास अधिकारी यांना काहीही सोयर सुतक नाही, याउलट पंचायत समितीमध्ये विहिरीसाठी लाभार्थ्या कडून दहा हजार रुपये प्रत्येकी रासरोसपणे घेतले, आजही पंचायत समिती मधील अभियंता, कर्मचारी, अधिकारी सर्रासपणे पैसे घेत असताना त्यांच्यावर कार्यवाही न करता सामान्य लाभार्थ्यांचा छळ गटविकास अधिकारी हे जाणीवपूर्वक करत असल्याने शेतकरी कामगार पक्षाच्या वतीने दिनांक १५ एप्रिल रोजी लाभार्थ्यांचे खाते त्वरित पुर्ववत करण्याची मागणी करण्यात आली असून दोन दिवसात घरकुल लाभार्थ्यांच्या खात्यांना पुर्ववत न केल्यास तीव्र आंदोलन करण्याचा इशारा शेतकरी कामगार पक्षाचे नेते भाई ॲड नारायण गोले पाटील यांच्यासह भाई मुंजा पांचाळ, भाई विष्णू शेळके, भाई श्रीराम शेवाळे, ज्ञानेश्वर ढगे राजकुमार अब्दल सिद्धेश्वर काळे, दिलीप वानखेडे आदींनी निवेदनाव्दारे दिला आहे.

दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
बुधवार, दि. १७ एप्रिल २०२४


# अंबाजोगाई वकील संघाचा निवडणुक कार्यक्रम जाहीर

## निवडणुक निर्णय अधिकारी ॲड.आर.आर.निर्मळे यांची माहिती

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

येथील अंबाजोगाई वकील संघ (अंबाजोगाई.जि.बीड) यांचा सन – २०२४ साठीचा निवडणुक कार्यक्रम सोमवार, दिनांक १५ एप्रिल रोजी जाहीर करण्यात आला आहे. त्यानुसार सदर निवडणुक ही अंबाजोगाई वकील संघाचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, सचिव, सहसचिव व ग्रंथपाल या पदांसाठी होणार आहे. अशी माहिती निवडणुक निर्णय अधिकारी ऍड.आर.आर.निर्मळे यांनी दिली आहे.

निवडणुक प्रक्रिया पुढीलप्रमाणे राबविण्यात येणार आहे. प्राथमिक मतदार यादी प्रसिध्द करणेचा टप्पा सुरू व संपविण्याची तारीख हि सोमवार, दिनांक १५ एप्रिल २०२४ रोजी दुपारी ०४ वाजेपर्यंत आहे. तर प्राथमिक मतदार यादीवर आक्षेप अर्ज स्विकारणे व त्यावरील निर्णय जाहिर करणेसाठी मंगळवार, दिनांक १६ एप्रिल २०२४ रोजी सकाळी ११ ते दुपारी १२ वाजेपर्यंत आहे. मतदार यादीवर आक्षेप त्यावरील सुनावणी व निर्णय जाहिर करणेसाठी मंगळवार, दिनांक १६ एप्रिल २०२४ रोजी दुपारी २ वाजेपर्यंत करण्यात येईल. अंतिम मतदार यादी प्रसिध्दी मंगळवार, दिनांक १६ एप्रिल २०२४ रोजी सायंकाळी ०५ वाजेपर्यंत करण्यात येईल. नामनिर्देशन पत्र देणे व स्विकारणे हे बुधवार, दिनांक १७ एप्रिल २०२४ (बुधवारी सुट्टीच्या दिवशी) रोजी ते गुरूवार, दिनांक १८ एप्रिल २०२४ रोजी सकाळी ११ ते दुपारी २ वाजेपर्यंत सुरू राहिल. नामनिर्देशन पत्राची छानणी गुरूवार, दिनांक १८ एप्रिल २०२४ रोजी सायंकाळी ४ वाजेपर्यंत होईल. तर वैध उमेदवाराची यादी प्रसिध्दी गुरूवार, दिनांक १८ एप्रिल २०२४ रोजी सायंकाळी ५ वाजता. नामनिर्देशन पत्र मागे घेणे शुक्रवार, दिनांक १९ एप्रिल २०२४ रोजी सकाळी ११ ते दुपारी २ वाजेपर्यंत. निवडणुक लढविणाऱ्या उमेदवाराची अंतिम यादी प्रसिध्दी शुक्रवार, दिनांक १९ एप्रिल २०२४ रोजी सायंकाळी ५ वाजता. तर मतदान सोमवार, दिनांक २२ एप्रिल २०२४ रोजी सकाळी ०८ ते दुपारी ३ वाजेपर्यंत. आणि मतमोजणी व निकाल हा सोमवार, दिनांक २२ एप्रिल २०२४ रोजी दुपारी ४ नंतर लगेचच जाहिर करण्यात येणार आहे. सदर निवडणुकीची सर्व प्रक्रिया ही दिवाणी न्यायालयातील ई – फायलिंग सेंटर मधील बाजुचे खोलीमध्ये वर निर्धारीत केलेल्या दिवशी व वेळेत केली जाईल. फक्त मतदान व निकाल प्रक्रिया ही जिल्हा न्यायालयातील वकील संघाचे हॉलमध्ये पुर्ण केली जाईल. कार्यक्रम पत्रिकेत बदल करण्याचा सर्वस्वी अधिकार हा निवडणुक निर्णय अधिकारी यांना राहील असे ऍड.आर.आर.निर्मळे (निवडणुक निर्णय अधिकारी, अंबाजोगाई वकील संघ, अंबजोगाई, जि.बीड) यांनी सोमवार, दिनांक १५ एप्रिल २०२४ रोजी निवडणूक कार्यक्रम जाहीर करताना सांगितले आहे.




माजलगाव :– येथील मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष कार्यालय येथे राष्ट्रवादी शरद पवार गटाचे लोकसभेचे उमेदवार बजरंग सोनवणे यांनी भेट दिली असता पक्षाच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला.

# डॉ. सुजित उत्तम हजारे यास एमबीबीएस पदवी प्रदान

**बीड । प्रतिनिधी**

बीड येथील ज्येष्ठ पत्रकार उत्तम कचरू हजारे यांचे चिरंजीव डॉ. सुजित उत्तम हजार यांना एमबीबीएस पदवी सोमवारी लातूर येथे झालेल्या शानदार कार्यक्रमात प्रदान करण्यात आली.

डॉ. सुजित हजारे याने लातूर येथील विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालतुन एमबीबीएसचे शिक्षण पूर्ण केले असून, एमबीएसच्या सर्व वर्षाच्या परिक्षेत सुजितने घवघवीत यश मिळविले आहे. इंटरशीप ( अंर्तवास) संपल्यानंतर, सोमवार दि.१५ एप्रिल रोजी लातूर येथे पदवीदान सोहळा संपन्न झाला. डॉ. सुजित हजारे यांचे प्राथमीक शिक्षण बीड येथील संस्कार विद्यालयातून तर महाविद्यालयीन शिक्षण बलभीम महाविद्यालयातून झाले आहे. त्यानंतर लातूर येथील विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात



त्याचा एमबीबीएससाठी नंबर लागल्यानंतर, त्याने एमबीबीएस पूर्ण केले. लातूर येथे झालेल्या कार्यक्रमास नातेवाईक, मित्रपरिवार व हितचिंतक उपस्थित होते. यापुढे वैद्यकीय क्षेत्रातील पदव्युत्तर पदवी घेऊन रुग्णांची सेवा करण्याचा मानस असल्याचे डॉ. सुजित उत्तम हजारे यांनी सांगितले. डॉ. सुजितच्या या यशाबद्दल ॲड. विश्वनाथराव मगर, उत्तमराव पवार, नागसेन धन्वे, डॉ. संतोष तुपेरे, लक्ष्मण हजारे, डी. के. जाधव, प्रा. गंगाधर घोडेराव, भारत मगर, रघुनाथ वक्ते, भाऊराव उपदेशे, कचरू घोडेराव, दिलीप जाधव, अजय हजारे, शरद मगर, राहूल हजारे, अविनाश मगर, विकास वक्ते, देविदास हजारे, आनंद हजारे, महेंद्र घोडेराव, प्रदीप उपदेशे, विशाल वक्ते, राजेंद्र कोरडे, संजय कोरडे, नितीन जावळे , नोबेल हजारे आदींनी अभिनंदन केले आहे. डॉ. सुजित हजारे यांचे सिरसमार्ग ग्रामस्थांसह जिल्हाभरातून अभिनंदन होत आहे.

# युगप्रवर्तक क्रिकेट चषक सुंदरराव सोळंके महाविद्यालयाने पटकावला

## सोळंके महाविद्यालयाचा दिंद्रुड संघावर १६ धावांनी विजय

**माजलगाव । प्रतिनिधी**

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त आयोजित युगप्रवर्तक क्रिकेट चषक सुंदरराव सोळंके महाविद्यालयाच्या प्राध्यापक संघाने दिंद्रुड केंद्र संघाचा १६ धावांनी पराभव करून युगप्रवर्तक चषक पटकावला.



डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त कास्ट्राईब कर्मचारी कल्याण महासंघाच्या वतीने कर्मचाऱ्यांसाठी युगप्रवर्तक क्रिकेट चषकाचे आयोजन करण्यात आले होते. या क्रिकेट स्पर्धेत १५ संघांनी सहभाग नोंदवला. अंतिम सामना सुंदरराव सोळंके महाविद्यालय व दिंद्रुड केंद्र संघात झाला. अंतिम चुरशीच्या सामन्यात सुंदरराव सोळंके महाविद्यालयातील प्राध्यापक संघाने खेळाचे उत्कृष्ट प्रदर्शन करत दिंद्रुड संघाचा १६ धावांनी पराभव केला. या स्पर्धेचे पारितोषिक वितरण आयपीएस अधिकारी डॉ.बी. धीरजकुमार यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी कास्ट्राईबचे तालुकाध्यक्ष राहुल टाकणखार, भारत टाकणखार, वसंत टाकणखार, शेख सलीम, राकेश साळवे,प्रमोद साळवे, इम्रान नाईक आदींची प्रमुख उपस्थिती होती.

युगप्रवर्तक चषक जिंकल्याबद्दल संघातील खेळाडू प्रा.सुदर्शन स्वामी (कर्णधार), प्रा. अरुण पेंटावार (उपकर्णधार), प्रा. रोहित शेटे, प्रा.सिद्धेश्वर कदम, प्रा. अमोल गायकवाड, प्रा. स्वप्नील टाक, प्रा.महेंद्र वानखेडे, प्रा.अशोक दौंडे, प्रा.बालाजी बोडके, प्रा.प्रविण कोरडे, प्रा.ममताराम येवले, प्रा.एकनाथ शेंडगे यांचे महाविद्यालय विकास समिती प्रमुख ऍड.बी.आर.डक, प्राचार्य डॉ. जी.के.सानप, उपप्राचार्य डॉ. एन.के.मुळे, उपप्राचार्य एम.ए.कव्हळे, प्रबंधक प्रशांत चव्हाण ,अधीक्षक सतीश एरंडे यांच्यासह प्राध्यापक व कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले.

# विविध उपक्रमांनी पार पडली जरेवाडी शाळेची शिक्षणजत्रा

**पिंपळवंडी । प्रतिनिधी**

विविध उपक्रम प्रभावी आणि उत्कृष्टरित्या राबविनाऱ्या जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा जरेवाडी, केंद्र- पिंपळवंडी, तालुका- पाटोदा येथे १६ एप्रिल २०२४ रोजी शिक्षणजत्रा आयोजित करण्यात आली होती. यामध्ये एकूण ३६ स्टॉलची उभारणी करण्यात आलेली होती. मराठी, इंग्रजी, गणित, विज्ञान, खगोलशास्त्र क्लब, ऍस्ट्रॉनॉमी क्लब, विविध प्रकारचे मनोरंजक खेळ, पथनाट्य, महाराष्ट्राची लोकधारा सांस्कृतिक नृत्य, कराओके संगीत, पारंपरिक संस्कृतीचे स्टॉल, आरोग्य, वाहतूक, पर्यावरण माहिती त्याबाबतचे नियम सांगणारे स्टॉल शालेय विद्यार्थ्यांनी लावले होते. लोकसभा निवडणूक २०२४ च्या अनुषंगाने यावेळी मतदान जनजागृती स्टॉल देखील उभारण्यात आला आणि मतदान जनजागृती पथनाट्य शालेय विद्यार्थ्यांनी याप्रसंगी सादर केले. विद्यार्थ्यांनी स्वतः खाद्यपदार्थ बनवून विक्री देखील केली. यामध्ये मटकी भेळ, वडापाव, विविध फ्लेवरचे थंडगार सरबत, मसाला शेंगादाणे, ब्रेड पॅटीस, गुलाब जामून इत्यादी खाद्यपदार्थांचे स्टॉल सहावी ते आठवीच्या विद्यार्थ्यांनी व्यवस्थितपणे मांडणी करून उभारले



आणि विद्यार्थी व पालकांना विक्री देखील केली. खाद्यपदार्थांच्या विक्रीमधून विद्यार्थ्यांनी तीन तासांमध्ये ५५ हजार ४०० रुपये जमवले. या विविधरंगी नाविन्यपूर्ण उपक्रमांनी सजलेल्या शिक्षणजत्रेसाठी इयत्ता सहावी ते आठवी मधील एकूण जवळपास १५६ विद्यार्थ्यांनी यामध्ये सहभाग घेतला होता. या शिक्षणजत्रेला पालकांनी प्रचंड प्रतिसाद दिला. विशेषत: माता पालकांची उपस्थिती लक्षणीय होती. सर्व मुलांच्या चेहऱ्यावर मनस्वी आनंद दिसून येत होता.

या शिक्षणजत्रा उपक्रमाचे उद्घाटन स्वामी विवेकानंद विद्यामंदिर बीड चे मुख्याध्यापक श्री.जगताप सर, पिंपळवंडी केंद्राचे केंद्रप्रमुख तथा मुख्याध्यापक गोविंद कदम सर यांच्या शुभ हस्ते करण्यात आले. या कार्यक्रमासाठी जरेवाडी शाळेतील सर्व शिक्षक वृंद तसेच जरेवाडी ग्रामस्थ यांनी विशेष सहकार्य करून टीमवर्कचे दर्शन घडविले. या कार्यक्रमासाठी पत्रकार बबनराव उकांडे, चंद्रकांत पवार, भाऊसाहेब पवार, अनिल गायकवाड, तसेच पिंपळवंडी केंद्रातील शिक्षक वृंद, तसेच या कार्यक्रमाची जाहिरात पाहून स्वामी विवेकानंद विद्यामंदिर बीड येथून जवळपास २४ शिक्षक कार्यक्रमास उपस्थित होते. तसेच परिसरातील सर्व शिक्षणप्रेमी नागरिक, आणि पालक वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता. एखाद्या मोठ्या जत्रेचे स्वरूप जरेवाडीला गावाला आले होते.

# डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी प्रबळ लोकशाहीसाठी मतदानाचा हक्क दिला –प्राचार्य विश्वास कंधारे

माजलगाव । प्रतिनिधी

अखिल विश्वाला मार्गदर्शक आणि दीपस्तंभ ठरावी अशी राज्यघटना आपल्या राष्ट्रासाठी निर्माण करण्याचे महान कार्य भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी केले.त्यातून सर्वसामान्य माणसाला मतदानाचा हक्क त्यांनी दिला असे प्रतिपादन कालिकादेवी महाविद्यालय(शिरूर कासार )चे प्राचार्य विश्वास कंधारे यांनी केले.

ते श्री सिद्धेश्वर महाविद्यालयात डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३३व्या जयंती निमित्त आयोजित मतदार जनजागृती स्वाक्षरी अभियानासाठी प्रमुख मार्गदर्शक म्हणून ते बोलत होते.याप्रसंगी श्री सिद्धेश्वर शैक्षणिक संकुलाचे कार्यवाह ऍड. विश्वास जोशी,महाविद्यालय समितीचे अध्यक्ष अभय कोकड, प्राचार्य डॉ सुहास मोराळे, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी डॉ. प्रेमदास राठोड, डॉ विकास बोरगावकर यांची प्रमुख उपस्थिती होती.

प्रमुख मार्गदर्शक प्राचार्य विश्वास कंधारे यांनी पुढे सांगितले की,भारत देशातील सामाजिक लोकशाही बळकट करण्यासाठी मतदानाचा पवित्र हक्क भारतीय संविधानाने आपणाला दिला आहे. त्यामुळे तो हक्क सर्वांनी बजावला पाहिजे. श्री सिद्धेश्वर महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने महाविद्यालयातील सर्व युवक, युवतींना मतदार जनजागृती स्वाक्षरी अभियानातुन मतदान करण्याची प्रेरणा देत लोकशाही बळकट करण्याचा संदेश देत आहेत.या अभिनव उपक्रमाचे संयोजन एन. एस. एस. चे कार्यक्रमाधिकारी डॉ. प्रेमदास राठोड, डॉ विकास बोरगावकर यांनी केले.

# धर्म टिकला तरच राष्ट्र टिकेल –ष.ब्र.विश्वचैतन्य शिवाचार्य

दिंद्रुड । प्रतिनिधी

धर्म टिकला तर राष्ट्र टिकेल, आणि राष्ट्रच उरले नाही तर जातीचे काय करणार? त्यामूळे स्वधर्माचे आचरण करा, आपल्या संस्कृतीची जोपासना करा. मातापित्यांनी आपल्या मुलांना पाश्चात्य संस्कृतीचे अनुसरण करण्यापेक्षा हिंदू धर्माच्या संस्कृतीचे महत्त्व पटवून द्या असे आवाहन आष्टी (लक्ष्मणाची) येथील श्री सिध्देश्वर मोरंगे मठाचे मठाधिपती श्रीगुरु विश्वचैतन्य शिवाचार्य स्वामीजी यांनी केले. माजलगाव तालुक्यातील दिंद्रुड येथे शिवनाम सप्ताहाची मंगळवारी सांगता झाली याप्रसंगी महाप्रसादाचे कीर्तन आष्टीचे ष.ब्र. विश्वचैतन्य

## दिंद्रुडच्या शिवनाम सप्ताहाची उत्साहात सांगता



शिवाचार्य स्वामीजी यांच्या उपस्थितीत पार पडले.

दिंद्रुड येथे मागील ३० वर्षांपासून प्रतिवर्षी हिंदू नववर्षाच्या प्रारंभी शिवनाम सप्ताहाचे आयोजन वीरशैव समाजाच्या वतीने करण्यात येते. राज्यभरातील नामांकित शिव कीर्तनकार याप्रसंगी उपस्थित होते, वीरशैव सिद्धांताचा प्रचार, प्रसार आणि प्रबोधन व समाजातील आबालवृध्दांनी धर्माचन करावे यासाठी मार्गदर्शन करतात. मंगळवारी दुपारी शिवनाम सप्ताहाची सांगता झाली. याप्रसंगी आष्टी येथील ष.ब्र.१०८ विश्वचैतन्य शिवाचार्य स्वामीजी यांचे प्रसादाचे कीर्तन संपन्न झाले.

गुरुप्रसादाची थोरी !
महिमा असे श्रेष्ठ भारी !!
प्रसाद घेताची स्वामीचा !
नाश होय षड्रिपूचा !!

या अभंगाद्वारे वीरशैव सिद्धांताचे आचरण करताना गुरुचे महत्व, धर्मानुसरण, महाप्रसाद व दानाचे महत्व, या विषयावर स्वामीजींनी अतिशय स्पष्ट शब्दात निरुपण केले. दिंद्रुड व पंचक्रोशीतील वीरशैव समाजासह भाविक भक्तांची उपस्थिती या प्रसंगी होती. गायनाचार्य भारत महाराज ब्याळे , सुर्यकांत ब्याळे, वैजनाथ काशीद,संतोष ठोंबरे, प्रमोद वीर,राचय्या स्वामी,पेटीवादक सुदाम ऊबाळे यांनी साथ दिली. आयुष्यमान भारत मिशन महाराष्ट्र समितीचे प्रमुख डॉ.ओमप्रकाश शेटे, मंगलनाथ मल्टीस्टेट चे मुख्य कार्यकारी अधिकारी रवींद्र कानडे, ह भ प उद्धव महाराज ठोंबरे यांची प्रमुख उपस्थिती होती. सौ. शिल्पा ओमप्रकाश शेटे यांच्या वतीने महाप्रसादाचे आयोजन शिवनाम सप्ताहाच्या सांगतेवेळी करण्यात आले. सप्ताह काळात अन्नदान करणाऱ्या अन्नदात्यांचा सत्कार यावेळी करण्यात आला.

# भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त सामाजिक उपक्रम न्यू सिद्धार्थ ग्रुप नवा मोंढा आणि हमाल मापाडी युनियन यांची बांधिलकी

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

शहरातील न्यू सिद्धार्थ ग्रुप, नवा मोंढा, मुकुंदराज कॉलनी आणि हमाल मापाडी युनियन, अंबाजोगाई यांच्या संयुक्त विद्यमाने यावर्षी ही भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त सामाजिक बांधिलकी जोपासत विविध उपक्रम राबविण्यात आले. अन्नदान करून तसेच विविध उपक्रम राबवून महामानवांना मानवंदना देण्यात आली.

याबाबत न्यू सिद्धार्थ ग्रुप, नवा मोंढा येथील भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष बालासाहेब आदमाने यांनी सांगितले की, अंबाजोगाई शहरात १४ एप्रिल रोजी विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा १३३ वा जयंती उत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात





आला. प्रारंभी मधुकर सखाराम आदमाने यांच्या हस्ते व संजयदादा सरवदे, संजयभाऊ साळवे, जीवन गव्हाणे, अकबर पप्पूलाले गवळी, मनोज सोनवणे, आकाश साळवे, बालासाहेब शिंदे, अनिस शेख, गौतम खरात, सुरेश वाघमारे यांच्या प्रमुख उपस्थितीत ध्वजारोहण करण्यात आले. न्यू सिद्धार्थ ग्रुप, नवा मोंढा आणि हमाल मापाडी युनियन, अंबाजोगाई यांच्या संयुक्त विद्यमाने विविध नाविन्यपूर्ण उपक्रम राबविण्यात आले. यातील अन्नदान ५ क्विंटल खिचडीचे वाटप हा उपक्रम संपूर्ण अंबाजोगाईकरांचे लक्ष वेधून घेणारा ठरला. अल्पोपहार म्हणून सर्वांना सकाळपासून ते संध्याकाळपर्यंत खिचडी वाटप करण्यात आली. राजेभाऊ साळवे यांच्या हस्ते खिचडी वाटप आणि पाणपोईचे उद्घाटन करण्यात आले. विशेष म्हणजे शहरात येणाऱ्या सर्व आंबेडकरी अनुयायी यांचेसाठी पिण्याच्या पाण्याची व्यवस्था यावर्षी ही करण्यात आली होती. सोनबा येवले पानपोईचे हे ११ वे वर्ष आहे. मान्यवरांकडून छत्रपती शिवरायांचे अंगरक्षक, वीर लढवय्ये जिवाजी महाले चौकाच्या नामफलकास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. जयंतीनिमित्त नवा मोंढा येथे भव्य मिरवणुक काढण्यात आली. मोठ्या थाटामाटात आणि आतिषबाजीच्या गजरात आयोजन करण्यात आले होते. यावेळी सर्व महामानवांचे विचार समाजासमोर घेऊन जाणारे आकर्षक नृत्य, प्रबोधनपर देखावे, लेझीम हे पारंपरिक कला प्रकार सादर करण्यात आले. या मिरवणुकीतील देखाव्यांनी लहान मुले, महिला भगिनी, ज्येष्ठ नागरिक, मान्यवर या सर्वांचे लक्ष वेधून घेतले होते. विशेष म्हणजे सर्व जाती – धर्माच्या लोकभावनांचा आदर करीत सदर मिरवणूक शांततामय वातावरणात काढण्यात आली. जयंती उत्सवाचे सोशल मीडियावरून लाईव्ह प्रक्षेपण करण्यात आले. या कार्यक्रमास सचिन विलासराव जाधव, माजी नगरसेवक दिनेश भराडीया या मान्यवरांची प्रमुख उपस्थिती लाभली होती. यासाठी जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष बालासाहेब आदमाने यांनी विशेष प्रयत्न केले. तर या सर्व कार्यक्रमांच्या यशस्वितेसाठी जयंती उत्सव समितीचे सर्व सदस्य तसेच हमाल मापाडी युनियन, अंबाजोगाई आणि न्यू सिद्धार्थ ग्रुप, नवा मोंढा, मुकूंदराज कॉलनी येथील भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव समितीचे पदाधिकारी, सदस्य आणि युवकवर्ग यांनी पुढाकार घेतला.

# सेवानिवृत्त आदर्श शिक्षिका पंचफुलाताई पवार यांचे निधन

**पिंपळवंडी । प्रतिनिधी**

पाटोदा तालुक्यातील पिंपळवंडी येथिल रहीवाशी व जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा पिंपळवंडीच्या माजी आदर्श शिक्षिका पंचफुलाताई त्रिंबकराव पवार यांचे अल्पशा आजाराने अहमदनगर येथील खाजगी रुग्णालयात उपचारादरम्यान दुःखद निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर त्यांच्या शेतामध्ये सायंकाळी ५:०० वाजता अंत्यसंस्कार करण्यात आले. गेल्या काही दिवसांपासून त्या आजारी होत्या. अखेर मंगळवार दिनांक १६ एप्रिल २०२४ रोजी वयाच्या ७३ व्या वर्षी त्यांनी अखेरचा श्वास घेतला. पंचफुलाताई पवार यांनी गेवराई तालूक्यातील बंगाली पिंपळा, पाटोदा तालूक्यातील आंबेवाडी आणि पिंपळवंडी



शाळेमध्ये आपली शिक्षक पदाची सेवा अत्यंत सेवावृत्तीने केली. शांत, संयमी, मनमिळावु, स्वभावाच्या ताई म्हणून त्या पिंपळवंडी पंचक्रोशीत प्रसिद्ध होत्या. त्यांनी घडवलेले अनेक विद्यार्थी आज वेगवेगळ्या पदावर कार्यरत आहेत. त्यांच्या निधनाबद्दल पिंपळवंडी परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे. त्यांच्या पश्चात पती त्रिंबक गणपत पवार सेवानिवृत्त शिक्षक, मुले श्रीकांत व संतोष (फौजी) तसेच एक विवाहीत मुलगी व सुना, नातवंडे असा परिवार आहे. त्यांच्या अंत्यसंस्कारासमयी परिसरातील आजी-माजी सरपंच, उपसरपंच, ग्रा.पं. सदस्य, चेअरमन, शिक्षक, पत्रकार, नातेवाईक व पिंपळवंडी, अंमळनेर परिसरातील सर्व स्थरातील नागरिक उपस्थित होते.

# हिंगोली बाजार समितीत हळदीची विक्रमी आवक

## मोजमाप करण्यासाठी लागेल ४ दिवसांचा कालावधी!

हिंगोली : हिंगोली येथील बाजार समितीच्या हळद मार्केट यार्डात यंदाच्या वर्षातील विक्रमी आवक १५ एप्रिल रोजी झाली. तब्बल २० हजार क्विंटल हळद विक्रीसाठी आली असून, मार्केट यार्ड आवारासह बाहेरील रस्त्यावर वाहनांची एक ते दीड कि.मी.पर्यंत रांग लागली. या सर्व हळदीचे मोजमाप करण्यासाठी चार दिवसांचा कालावधी लागणार आहे. दरम्यान, क्विंटलमागे भावात जवळपास पाचशे रूपयांची घसरण झाल्याचे शेतकऱ्यांनी सांगितले.

मराठवाड्यासह विदर्भात प्रसिद्ध असलेल्या येथील बाजार समितीच्या संत नामदेव मार्केट यार्डात विक्रमी आवक होऊ लागली आहे. १५ एप्रिल रोजी भावात क्विंटलमागे जवळपास पाचशे रुपयांची घसरण झाली तरी सध्या मिळणारा भाव समाधानकारक आहे. त्यामुळे हळद तयार होताच शेतकरी मार्केट यार्डात विक्रीसाठी आणत आहेत. त्यामुळे आवक वाढत आहे.

१४ एप्रिल रोजी मार्केट यार्ड रविवारच्या नियमित सुटीमुळे बंद होते. परंतु, सोमवारी खरेदी-विक्री होणार असल्यामुळे शेतकऱ्यांनी रविवारीच हळद घेऊन मार्केट यार्ड जवळ केले. त्यामुळे रात्री ८ वाजेपर्यंत मार्केट यार्डात वाहने उभी करण्यासाठी जागा शिल्लक नव्हती. परिणामी, नंतर आलेल्या वाहनांना मार्केट यार्डाबाहेरील रेल्वे स्टेशन रोडवर वाहने उभी करावी लागली. सोमवारी दुपारी



२ वाजेपर्यंत जुने पोलीस अधीक्षक कार्यालय, जुन्या शासकिय रुग्णालयापर्यंत वाहनांची रांग लागली होती. गत आठवड्याच्या तुलनेत क्विंटलमागे पाचशे ते सातशे रूपयांनी भाव घसरले आहेत. सोमवारी १३ हजार ते १६ हजार रुपया दरम्यान हळदीला भाव मिळाला. दोन दिवसांपूर्वी झालेल्या पावसामुळे हळदीत ओलसरपणा आल्यामुळे भाव किंचित घसरल्याचे व्यापार्यांचे म्हणणे आहे, परंतु, येणार्या दिवसात भाव वधारण्याची शक्यताही वर्तविली जात आहे.

हळदीची विक्रमी आवक होत असल्याने बाजार समितीच्यावतीने येणाऱ्या प्रत्येक वाहनाची नोंद करण्यात येत आहे. दाखल होणारी वाहने नंबरनुसार रांगेत उभी करण्यात येत असून, त्याचे व्हिडीओ रेकॉर्डिंगही केले जात आहे. त्यामुळे मार्केट यार्ड आवारात आणि मोजमापासाठी नंबरनुसार वाहने सोडणे सोयीचे होत आहे. यामुळे शेतकऱ्यांतूनही समाधान व्यक्त होत आहे.

### दररोज ५००० क्विंटलचा काटा

मार्केट यार्डातील मनुष्यबळानुसार दररोज पाच हजार क्विंटलचा काटा होऊ शकतो. शेतकर्यांच्या हळदीचे लवकर मोजमाप व्हावे यासाठी बाजार समितीचा प्रयत्न असतो, परंतु, विक्रमी आवक होत असल्यामुळे उशीर लागत असल्याचे चित्र आहे. सोमवारी सकाळी १० वाजेपर्यंत जवळपास २० हजार क्विंटलची आवक झाल्याने मोजमापासाठी चार दिवसांचा कालावधी लागण्याची शक्यता आहे.

# गोडेतेलाच्या दरात ५ ते ८ रुपये किलोने घसरण होणार



## सोयाबीन उत्पादक चिंतेत!

पुणे : गेल्या काही दिवसांपासून केंद्र सरकारने गोडेतेलाचे दर नियंत्रणात ठेवण्यासाठी मोठ्या उपाययोजना केल्या. वर्षभर बाहेरील देशातून वेळोवेळी मोठ्या प्रमाणात आयात करण्यात आली. परिणामी, सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना योग्य दर मिळत नसल्याचे पाहायला मिळत आहे. अशातच आता आंतरराष्ट्रीय बाजारात खाद्यतेलाचे दर नरमल्याने, येत्या काही दिवसांत गोडेतेलाचे दर प्रती किलोमागे ५ ते ८ रुपयांनी कमी होण्याची शक्यता आहे. असे खाद्यतेल व्यापारातील जाणकारांकडून सांगितले जात आहे.

सध्याच्या घडीला बाजारात शेंगदाणा तेल १८५ ते २२० रुपये किलो, सूर्यफुल तेल ११० ते १२५ रुपये किलो, तर सोयाबीनचे तेल ९१ ते ९३ रुपये प्रति किलो दरम्यान असल्याचे पाहायला मिळत आहे. विशेष म्हणजे सध्या सणासुदीसह लग्नसराईचा काळ आहे. ज्यामुळे बाजारात सध्या तेलाला मोठ्या प्रमाणात मागणी आहे. त्यामुळे आता आंतरराष्ट्रीय बाजारातील दर घसरणीचा परिणाम देशांतर्गत बाजारात पाहायला मिळणार असून, जमुळे गोडेतेलाच्या दरात ५ ते ८ रुपयांनी घसरण होण्याची शक्यता आहे. ज्याचा सर्वसामान्यांना मोठा दिलासा मिळणार आहे.

खाद्यतेलाच्या दरात मोठी घसरण होणार असली तरी त्याचा सर्वाधिक फटका हा तेलबिया उत्पादक शेतकऱ्यांना सहन करावा लागणार आहे. गोडेतेलाच्या दरात घसरण झाल्यास साहजिकच सोयाबीन, सूर्यफूल, शेंगदाणा यांच्या दरात घसरण होणार आहे. त्यामुळे आधीच वर्षभापासून सोयाबीनचे दर घसरलेले असताना, त्यात आणखी घसरण होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. सध्यस्थितीत सोयाबीनला हमीभावापेक्षाही कमी दर मिळत आहे. त्यामुळे आता सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांचा पाय आणखीनच खोलात जाण्याची शक्यता आहे. ज्यामुळे शेतकऱ्यांना 'दुष्काळात तेरावा महिना' म्हणण्याची वेळ आहे. आंतरराष्ट्रीय बाजारपेठेतील खाद्यतेल, तेलबियांचा दर कमी होत आहे. याशिवाय केंद्र सरकारने खाद्यतेल आयात सुरूच ठेवली आहे. ज्यामुळे देशांतर्गत बाजारात खाद्यतेलाला मागणी वाढली आहे. अर्थात मागणी वाढूनही आंतरराष्ट्रीय बाजारातील दबावामुळे देशातील खाद्यतेलाच्या दरात ही घसरण पाहायला मिळणार आहे.

# गूळ तयार करण्यासाठी योग्य ऊस ओळखा

राज्यात मोठ्या प्रमाणात ऊस लागवड केली जाते. प्रामुख्याने महाराष्ट्र आणि उत्तरप्रदेश हे दोन राज्य देशातील आघाडीवरील ऊस उत्पादक राज्य आहेत. त्यामुळे या दोन्ही राज्यांमध्ये साखरनिर्मिती व्यवसाय आणि गूळ निर्मिती व्यवसाय चांगलाच बहरला आहे. मात्र आता गूळनिर्मिती करताना उसाची पारख कशी करायची? असा प्रश्न गुऱ्हाळ चालवणाऱ्या शेतकऱ्यांसमोर असतो. साधारणपणे शेतकरी पारंपरिक पद्धतीने अंदाज लावत उसाची निवड करतात. हे चुकीचे असून शेतकऱ्यांना त्यातून आर्थिक तोटा संभवतो. याच पार्श्वभूमीवर नेमकी गूळनिर्मिती व्यवसाय करताना काय काळजी घेतली पाहिजे? याबाबत आज आपण जाणून घेणार आहोत.



गूळनिर्मिती व्यवसायातील तज्ज्ञांच्या मते, ज्या उसाच्या माध्यमातून गूळनिर्मिती केली जाणार आहे. त्याची निवड करताना शेतात तोडणीच्या आधीपासूनच काळजी घेतली पाहिजे. त्यासाठी १२०० रुपयांना मिळणाऱ्या ब्रिक्स मीटर खरेदी करावे. वापरात असलेल्या उसाच्या रसाचे काही थेंब टाकून बघावेत. या मीटरमध्ये तुम्हाला आकाशी आणि सफेद असे दोन रंग दिसले. किंवा मग या मीटरमध्ये रसाची व्हॅल्यू ही २० हुन अधिक असेल तर तो ऊस गूळनिर्मितीसाठी सर्वोत्तम मानला जातो. इतकेच नाही तर गूळनिर्मितीसाठी उसाची तोडणी केल्यानंतर हा ऊस अधिक काळ तसाच न ठेवता. त्याचे २४ तासांच्या आत गाळप होणे आवश्यक असते. याशिवाय गाळपाला काहीसा वेळ असेल तर तोडणी करून आणलेला ऊस उन्हात ठेवू नये. यामुळे प्रत्येक दोन तासाला उसातील २ टक्के सुक्रोजची घट होते. हे गूळनिर्मिती साठी खूप नुकसानदायी ठरू शकते. त्यामुळे सकाळी आणल्यानंतर दिवसभरात त्या उसाचे गाळप होणे गरजेचे असते.

गाळपानंतर पुढील प्रक्रिया गूळनिर्मितीसाठी रस कढईत टाकण्याची असते. उसाचा कढईत टाकल्यानंतर त्यातील सुक्रोज हे ग्लूकोज आणि फ्लोक्टोजमध्ये रूपांतरित होऊ नये. म्हणून शेतकऱ्यांनी काळजी घेतली पाहिजे. यासाठी तुरटीचा वापर देखील केला जाऊ शकतो. किंवा मग संबंधित उसाच्या रसाचा पीच देखील जाणून घेतला जाऊ शकतो. तो ६.४ ते ६.८ दरम्यान असणे आवश्यक असते. संपूर्ण गूळनिर्मिती प्रक्रिया दरम्यान खूप काळजी घ्यावी लागते. मात्र, या त्यातील काही महत्वाच्या स्टेप्स आहेत.

ज्या गूळनिर्मिती व्यवसायातील तोटा कमी करण्यास अर्थात आर्थिक नुकसान टाळण्यास मदत होते. याशिवाय शेतकऱ्यांनी उसाचा रस काढण्यासाठी हॉरिजॉन्टल क्रॉशर (आडवे रस यंत्र) वापरले पाहिजे. ज्यामुळे १० टक्के अधिक रस मिळण्यास मदत होते. इतकेच नाही तर कढईमध्ये रस उकळवताना ११४ डिग्रीपर्यंत उकळला पाहिजे. त्यापेक्षा अधिकही नको आणि कमीही नको. या योग्य तापमानात रस उकळल्यास त्यातून उत्तम प्रतीचा गूळ बनतो. साखर कारखान्यात साखर तयार करण्यासाठी १२१ डिग्रीपर्यंत उसाचा रस उकळला जातो.

# गाई, म्हशींमधील डायफ्रॅमॅटिक हर्निया कसा ओळखाल

गाई, म्हशींच्या शरीरातील स्नायू जेव्हा कमजोर बनतात आणि सतत असलेल्या दबावामुळे किंवा इतर कारणामुळे हर्निया होतो. हर्निया म्हणजे शरीरातील नैसर्गिक किंवा अनैसर्गिक छिद्रातून एखादा अवयव, इंद्रिय किंवा त्या अवयवाचा भाग बाहेर येतो. छाती आणि पोट यांच्यामध्ये असणारा पडदा म्हणजे डायफ्रॅम.

या डायफ्रॅममुळे छातीची पोकळी आणि उदर पोकळी हे वेगवेगळे केले जातात. डायफ्रॅमॅटिक हर्निया हा पचनसंस्थेचा गंभीर विकार आहे जो गाई, म्हशींमध्ये दिसतो. या आजारामध्ये छाती आणि पोट यांच्यामध्ये असणारा पडदा (डायफ्रॅम) कमजोर होऊन त्यामध्ये छिद्र तयार होते. या छिद्रामधून पोटाचे काही अवयव छातीमध्ये येतात आणि त्या ठिकाणी गोलाकार भाग तयार होतो. जे रवंथ करणारे प्राणी असतात त्यांच्या पोटाचे चार कप्पे असतात रुमेन, रेटीकुलम, ओमॅझम आणि अबोमॅझम. यातील रेटीकुलम हा भाग छातीच्या पडद्याजवळ असतो. डायफ्रॅमॅटिक हर्नियामध्ये हाच भाग छातीच्या पोकळीत येतो. मात्र रेटीकुलम सोबतच कधीतरी ओमॅझम, अबोमॅझम, आतडे आणि यकृतसुद्धा छातीच्या पोकळीत प्रवेश करतात. परंतु हे फार क्वचित प्रसंगी दिसून येते. डायफ्रॅमॅटिक हर्निया हा प्रामुख्याने उजव्या बाजूला आढळून येतो. हा आजार जास्त प्रमाणात वयस्क म्हशींमध्ये दिसतो.



कारणे : आजार जन्मजात असू शकतो किंवा गाई,म्हशी मोठ्या झाल्यावर होऊ शकतो. क्वचित प्रसंगी हा आजार बैल आणि रेडे यांच्यामध्ये दिसतो. हा आजार मुख्यत्वे करून मादी जनावरांच्यामध्ये दिसतो. आजार नेमका कसा होतो तर याचे अनेक कारणे असू शकतात, जसे की छातीच्या पडद्याचा जन्मजात कमजोरपणा, अपघात, अखाद्य लोखंडी वस्तू उदा. तार, खिळा, सुई किंवा इतर टोकदार वस्तू खाण्यात आल्याने पोट आणि छातीमधील पडदा फाटतो. गाभणपणामुळे (शेवटचे तीन महिने) छातीच्या पडद्यावर दाब पडणे, इतर काही कारणांमुळे छातीच्या पडद्यावर (उदा. पोटफुगी) अतिरिक्त ताण येतो. उन्हाळ्यात चाऱ्याच्या कमतरतेमुळे गाई-म्हशी अखाद्य वस्तू खातात. यामुळे त्यांच्या शरीरात टोकदार वस्तू प्रवेश करतात. या टोकदार वस्तू जर सरळ पोटाच्या रेटीकुलम भागात जाऊन पडल्या तर इजा होत नाही परंतु त्या जर आडव्या गेल्या तर रेटीकुलमला छेदून छातीच्या पोकळीत येतात. त्यामुळे छाती आणि पोट यांच्यामध्ये असणारा पडद्याला (डायफ्रॅम) छिद्र पडते.अपचन झाल्यास पोट फुगणे, गाभणपणामुळे उदर पोकळीचा आकार वाढणे इत्यादी कारणांमुळे डायफ्रॅम ला असलेले छिद्र वाढते. यामुळे डायफ्रॅमॅटिक हर्निया होतो.

प्रसूतीच्या वेळेस गाई, म्हशी कळा देतात. त्यामुळे डायफ्रॅम फाटू शकते. बद्धकोष्ठतेमुळे गाई, म्हशी शेण टाकण्यासाठी जोर लावतात यामुळे डायफ्रॅम फाटू शकते. काही वेळेस गाई, म्हशी जोरदारपणे पडल्यास किंवा वाहन अपघातामुळे पडल्यास इजा होऊन डायफ्रॅम फाटू शकते.

लक्षणे : वारंवार पोटफुगी होते. ही पोटफुगी औषधोपचार केल्यानंतर कमी होते. मात्र औषधाची परिणामकारकता संपल्यानंतर परत पोट फुगते. आजारात छातीच्या पोकळीतील अवयव (हृदयाचे बाह्य आवरण, फुफ्फुस ), उदर पोकळीतील अवयव(रेटीकुलम) आणि हर्नियाची रिंग एकमेकांना चिटकतात. हृदयाचे ठोके अनियमित होतात, क्षीण होतात. श्वास घेण्यास त्रास होतो. श्वास घेताना घर घर आवाज येतो. चालताना आखडतात. गाई, म्हशींना खोकला लागतो. हा खोकला औषधोपचार केल्यानंतरही कमी होत नाही. चारा कमी खाणे किंवा अजिबात चारा न खाणे. वजन कमी होते. छातीच्या पोळीवर (पुढच्या दोन पायासमोरील भाग) सूज येते.

उतारावरून येत असताना धाप लागणे, दम लागतो. मानेत असणारी रक्तवाहिनी ठळकपणे दिसून येते किंवा कधी कधी दिसत नाही. दूध अचानकपणे कमी होते. जनावर कमजोर होते. जनावर पातळ शेण टाकते, कधी काळ्या रंगाचे पातळ शेण टाकते, शेणाला घाण वास येतो. साधारणपणे रवंथ करणाऱ्या प्राण्यांमध्ये उलटी म्हणजेच खाल्लेले अन्न तोंडावाटे येत नाही परंतु डायफ्रॅमॅटिक हर्नियामध्ये आजार वाढल्यावर खाल्लेले अन्न तोंडावाटे बाहेर पडते. आजाराने ग्रस्त गाई, म्हशींना फुफ्फुसदाह(न्यूमोनिया) होतो. वेळेवर उपचार झाले नाही तर आजारानेग्रस्त गाई, म्हशी मलूल होतात. त्यांच्या शरीरातील पाण्याचे प्रमाण अतिशय कमी होते. सर्वात शेवटी त्यांचा मृत्यू होतो.

## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१९३५ : सन म्युंग मूनला येशू ख्रिस्ताने स्वप्नात साक्षात्कार दिला व आपण सुरु केलेले कार्य पुढे नेण्याची आज्ञा केली.
१९४१ : दुसरे महायुद्ध युगोस्लाव्हियाने जर्मनीसमोर शरणागती पत्करली.
१९४६ : सिरीयाने फ्रान्सकडून स्वातंत्र्य मिळवले.
१९५० : बॅ. मुकुंदराव जयकर पुणे विद्यापीठाचे पहिले कुलगुरू झाले.
१९५२ : पहिली लोकसभा अस्तित्वात आली.
१९७० : चांद्रयान अपोलो १३तील अंतराळवीर सुरक्षितपणे पृथ्वीवर परतले.
१९७१ : द पीपल्स रिपब्लिक ऑफ बांग्लादेशची स्थापना झाली.
१९७५ : ख्मेर रुजने कंबोडियाची राजधानी नॉम पेन्ह जिंकली.
१९८० : 'अपोलो-१३' हे अंतराळयान चांद्रमोहीम अर्ध्यावर सोडून सुखरुप पृथ्वीवर परतले.
१९८३ : भारतीय अवकाश संशोधन संस्थेने उपग्रह प्रक्षेपण वाहन(रॉकेट) 'एसएलव्ही३' चे प्रक्षेपण केले.
१९९३ : एसटीएस-५४ हे संशोधक अंतराळयान सुखरूप पृथ्वीवर परतले.
२००१ : अफवांच्या अर्थशास्त्राचा सिद्धांत मांडणारे मॅसेच्युसेट्स इन्स्टिट्युट ऑफ टेक्नॉलॉजी मधील अर्थशास्त्रज्ञ प्रा. अभिजित बॅनर्जी यांना पहिला 'माल्कम आदिशेषय्या पुरस्कार' जाहीर

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१४७९ : कवी सूरदास, हिंदीतील एक थोर कवी व श्रेष्ठ कृष्ण भक्त.
१८२० : बेसबॉल चे जनक अलेक्झांडर कार्टराईट यांचा जन्म. (मृत्यू: १२ जुलै १८९२)
१८३७ : जे. पी. मॉर्गन अमेरिकन सावकार (मृत्यू: ३१ मार्च १९१३)
१८९१ : यशवंत रामकृष्ण दाते कोशकार. चिं. ग. कर्वे यांच्या साहाय्याने त्यांनी 'महाराष्ट्र मंडळ कोश' स्थापन करून आठ खंडांचा 'महाराष्ट्र शब्दकोश' तयार केला. (मृत्यू: २१ मार्च १९७३)
१८९७ : निसर्गदत्त महाराज अद्वैत तत्त्वज्ञानी (मृत्यू: ८ सप्टेंबर १९८१)
१९१२ : भारतीय कादंबरीकार आणि मल्याळम साहित्याचे लघुकथा लेखक थकाझी शिवसंकरा पिल्लई यांचा जन्मदिन.
१९१६ : सिरीमाओ बंदरनायके श्रीलंकेच्या ६ व्या व जगातील पहिल्या महिला पंतप्रधान. त्यांचे पती श्रीलंकेचे व दुसरे पंतप्रधान सॉलोमन बंदरनायके यांच्या हत्येनंतर त्या पंतप्रधान झाल्या. त्यांनीच देशाचे 'सिलोन' हे नाव बदलून 'श्रीलंका' केले. खाजगी शाळा, तेलमंपन्या रबराचे मळे व चहाचे मळे यांचे त्यांनी राष्ट्रीयीकरण केले. (मृत्यू: १० आक्टोबर २०००)
१९४३ : भारतीय इतिहासकार व प्राध्यापक डॉ. एन. एन. नामपोथीरी यांचा जन्मदिन.
१९५१ : बिंदू चित्रपट अभिनेत्री
१९६१ : गीत सेठी बिलीयर्डसपटू
१९७२ : मुथैय्या मुरलीधरन श्रीलंकेचा क्रिकेटपटू
१९७७ : दिनेश मोंगिया क्रिकेटपटू

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१७९० : बेंजामिन फ्रँकलिन, विजेच्या शक्तीविषयी महत्त्वाचा शोध लावणारे अमेरिकेतील थोर शास्त्रज्ञ.
१८८२ : फ्लश टॉयलेट चे शोधक जॉर्ज जेनिंग्स यांचे निधन. (जन्म: १० नोव्हेंबर १८१०)
१९४६ : व्ही. एस. श्रीनिवासशास्त्री कायदेतज्ञ, सूक्ष्मबुद्धीचे राजकारणी, भारत सेवक समाजाचे अध्यक्ष आणि इंग्रजी वक्ते (जन्म: २२ सप्टेंबर १८६९)
१९७५ : डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन भारताचे दुसरे राष्ट्रपती, पहिले उपराष्ट्रपती आणि तत्त्वज्ञ, त्यांच्या गौरवार्थ त्यांचा जन्मदिन हा भारतात 'शिक्षक दिन' म्हणून ओळखला जातो. (जन्म: ५ सप्टेंबर १८८८)
१९९७ : बिजू पटनायक ओरिसाचे मुख्यमंत्री, केन्द्रीय पोलाद, खाणकाम आणि कोळसा मंत्री (जन्म: ५ मार्च १९१६)
१९९८ : चित्रपट निर्माते विजय सिप्पी (वय ५५) यांचा संशयास्पद परिस्थितीत मृत्यू (जन्म:)
२००१ : डॉ. वामन दत्तात्रय तथा 'वा. द.' वर्तक वनस्पतीशास्त्रज्ञ व देवराई अभ्यासक (जन्म: १९ आक्टोबर १९२५)
२००४ : सौंदर्या कन्नड, तामिळ, तेलगू, मल्याळम आणि हिन्दी चित्रपट अभिनेत्री (जन्म: १८ जुलै १९७२)
२००५ : भारतीय राज्य उत्तरप्रदेश आणि हिमाचल प्रदेशाचे माजी राज्यपाल विष्णू शास्त्री यांचे निधन.
२०११ : विनायक आदिनाथ तथा 'वि. आ.' बुवा विनोदी साहित्यिक (जन्म: ४ जुलै १९२६)
२०१२ : वसंत दिवाणजी, कन्नड साहित्यात मौल्यवान योगदान देणारे प्रतिभावंत लेखक.

## 'ताकारी' शनिवारपासून पुन्हा होणार सुरू

सांगली जिल्ह्याच्या घाटमाथ्यावरील कडेगाव, खानापूर, तासगाव या दुष्काळी तालुक्यांना वरदान ठरलेल्या ताकारी उपसा सिंचन योजना २० एप्रिलपासून सुरू करण्याचे आदेश अधीक्षक अभियंता चंद्रशेखर पाटोळे यांनी दिल्याची माहिती कार्यकारी अभियंता राजन डवरी यांनी दिली. या बाबत सांगली पाटबंधारे मंडळाची बैठक शनिवारी (ता. १३) झाली. ताकारी योजनेचे दुसरे रब्बी आवर्तन २२ जानेवारी ते १७ मार्च असे सलग ५६ दिवस सुरू होते. हे पाणी मुख्य कालव्याच्या शेवटी १४४ किलोमीटरवरील सोनी-भोसे (ता. मिरज) पर्यंत पोहोचल्यावर बंद करण्यात आले. दरम्यान, पंधरा दिवसांपासून वाढलेल्या उन्हामुळे सिंचनक्षेत्राला सतत पाणी द्यावे लागत असल्याने जमिनीतील पाणीपातळी प्रचंड खालावली आहे.

विहिरी व कूपनलिका सांगळ्यावर आल्या आहेत. पिके कशी जगवायची, या विवंचनेत शेतकरी आहेत. यंदा पाऊसच झाला नसल्याने लाभक्षेत्रातील बहुसंख्य गावांना पिण्याच्या पाण्यासाठी ताकारी पाण्यावरच अवलंबून राहावे लागत आहे. पाणी कमी झाल्याने बऱ्याच गावांच्या योजनांवर परिणाम झाला. आठच दिवस पाणी पुरले असते. शिवाय कोयना धरणात पुरेसा पाणीसाठा असूनही ताकारीचे पाणी का सुरू होत नाही, असा प्रश्न लाभक्षेत्रातून विचारला जात आहे. पाणी वेळेत न आल्यास शेती उद्ध्वस्त झाली असती.

# पाण्यासाठी वन्यजीव कासावीस; वनक्षेत्रातील पाणवठे कोरडेठाक

## वनपरिक्षेत्र अधिकारी काकडे यांना तक्रार

लिंबागणेश । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यावर दुष्काळाचे सावट ओढावले असुन बहुतांश विहिरी, साठवण तलाव आणि धरणाच्या पाण्याने तळ गाठला असुन बोअरवेलचे पाणी सुद्धा कमी झाले आहे. बीड तालुक्यातील करचुंडी नियतक्षेत्र अंतर्गत बेलगाव,पिंपरी,सोमनाथ वाडी,फुकेवाडी गाव शिवारा लगत असलेल्या वनक्षेत्रामध्ये वन्यप्राण्यांसाठी पानवठे बांधण्यात आले असुन नैसर्गिक पाणवठे असलेल्या पाझर तलावात गाळमिश्रित पाणी नावालाच शिल्लक आहे.

वन्यप्राण्यांची नित्यनेमाने सोय व्हावी यासाठी वनविभागाने बांधलेल्या पाणवठ्यात टँकर द्वारे २-३ दिवसाला पाणी सोडणे बंधनकारक आहे मात्र प्रत्यक्षात पाहणी केली असता नित्यनेमाने पाणी पुरवठा होत नसल्याचे निदर्शनास आले आहे.अवकाळी पावसाने तळाशी साचलेल्या पाण्यात शेवाळ साचलेले आढळून येते.वन्यजीव पाण्यासाठी भटकंती करत असुन या वनक्षेत्रातील पाणवठे



कोरडेठाक पडल्याने वन्यजीव पाण्यासाठी कासावीस होत असल्याचे दिसून येत आहे.परंतु वन्यजीवांची तहान भागवण्यासाठी वन विभागाला उसंत मिळत नसुन मानवासह वन्यप्राण्यावर पडलेल्या दुष्काळाबाबत वनविभागाला गांभीर्य नाही का असा संतप्त सवाल वन्यप्रेमीमधुन उपस्थित केला जात आहे. एकीकडे वन्यप्रेमी सामाजिक संघटना स्वखर्चाने वन्यप्राण्यांची टँकरद्वारे पाण्याची सोय करत असताना वनविभागातील कर्मचारी यांना यांचे गांभीर्य नसल्याची तक्रार सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी अशोक काकडे वनपरिक्षेत्र अधिकारी बीड यांना केली असुन आढावा घेऊन पाण्याची सोय करण्यात येईल असे आश्वासन काकडे यांनी दिले आहे.

वनक्षेत्रातील पाणवठ्यात पाणी नसल्याने वनविभागाच्या क्षेत्रातील हरीण, लांडोर,मोर आदि.वन्यजीव पाण्याच्या शोधात गावतलावाकडे धाव घेत असुन गेल्यावर्षी पिंपरनई गावातील तलावावर पाण्याच्या शोधार्थ आलेल्या लांडोराचा कुत्र्यांनी केलेल्या हल्ल्यात मृत्यू झाला होता. सध्या पानवठे कोरडेठाक असल्याची तक्रार सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे यांनी अशोक काकडे वनपरिक्षेत्र अधिकारी बीड यांना केल्यानंतर संबंधित ठिकाणचा आढावा घेण्यात येईल तसेच पाणवठ्याच्या ठिकाणी पाण्याची सोय करण्यात येईल असे आश्वासन दिले.

# डॉ.ज्योती मेटे यांची हिवरसिंगा येथील सप्ताहास सदिच्छा भेट




शिरूर । प्रतिनिधी

हिवरसिंगा ता.शिरुर येथील संतशिरोमणी सावता महाराज मंदिर देवस्थान व गावकरी मंडळी हिवरसिंगा यांच्या वतीने आयोजित अंखड हरिनाम सप्ताहास डॉ.ज्योतीताई विनायकराव मेटे यांनी सदिच्छा भेट देऊन संतशिरोमणी सावता महाराज मंदिर यांचे आशिर्वाद घेतले यावेळी मंदीर देवस्थान व गावकरी यांच्या वतीने अरुण दुधाळ, प्रभाकर दुधाळ, महादेव दुधाळ, जालिंदर दुधाळ, बाळासाहेब दुधाळ, शामसुंदर दुधाळ, अशोक दुधाळ, बाजीराव दुधाळ, रंगनाथ देवकर, सिध्देश्वर दुधाळ, मुंकीद दुधाळ यांच्या वतीने यथोचित सन्मान व दुधाळ यांनी स्वागत केले.

गतवर्षी पासुन संतशिरोमणी सावता महाराज मंदिर यांचे कलशारोहण व रामजन्म निमित्ताने आयोजित सप्ताह मध्ये प्रतिदिन विष्णू सहस्त्रनाम, ग्रंथराज ज्ञानेश्वरी व गीतरामायण, हरिपाठ, किर्तन, हरिजागर, यांचे आयोजन करण्यात येते. हिवरसिंगा, औरंगपूर, मलकाचीवाडी, खोकरमोहा व पंचक्रोशीतील भाविक भक्त उपस्थिती आसतात. तसेच प्रतिदिन उपस्थित भाविक भक्तांना स्वादिष्ट भोजन-प्रसाद देखील असतो. या सर्व धार्मिक विधीची माहिती देत गावकरी यांनी डॉ.ज्योती यांचे अदारातिथ्थ केले. यावेळी नारायण काशिद, अनिल घुमरे, नितीन लाटकर, ज्ञानेश्वर कोकाटे, नवनाथ प्रभाळे, माऊली शिंदे, शिवराम राऊत, महादेव बहिर,रामेश्वर पांडुळे,या शिवसंग्राम पदाधिकारी तसेच भिमराव बडे, कैलास दुधाळ,विठ्ठल दुधाळ, रामेश्वर सानप, भिमराव नांगरे,सह भाविक भक्त, महिला मंडळ,ग्रामस्थ उपस्थित होते.



# रामनवमी निमित्ताने केले १७१ जणांनी रक्तदान

युसूफवडगांव । प्रतिनिधी

केज तालुक्यातील युसूफवडगांव येथे श्रीराम जन्मोत्सवा निमित्त आधार युवा मंचच्या वतीने आयोजित रक्तदान शिबीरामध्ये तरूणांनी उत्स्फूर्त पणे सहभागी होत १७१ जणांनी केले रक्तदान.

युसूफवडगांवचे ग्रामदैवत असलेले प्रभु श्रीराम यांच्या जन्मोत्सवा निमित्त गेल्या १३ वर्षापासून आधार युवा मंचच्या वतीने सामाजिक उपक्रम व सामाजिक बांधिलकी म्हणुन भव्य अशा स्वरूपात रक्तदान शिबीर आयोजित करण्यात येते याही वर्षी आधार युवा मंचच्या वतीने दि.१६ रोजी गावातील हनुमान मंदिरात भव्य रक्तदान शिबीर आयोजित करण्यात आले होते.यावेळी गावातील नव तरूणांनी उत्स्फूर्त पणे यात आपला सहभाग नोंदवुन तब्बल १७१ जणांनी रक्तदान केले.हे रक्तदान शिबीर यशस्वी होण्यासाठी आधार युवा मंचच्या सर्व सदस्य मेहनत घेत रक्तदान शिबीर यशस्वी केले.

# नगर परीषदेच्या अभ्यासिकेचे काम पुर्णत्वाकडे-डॉ. उत्कर्ष गुट्टे

अंबाजोगाई

भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३३ व्या जयंतीनिमित्त गेली अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर अभ्यासिकेचे काम पुर्णत्वाकडे आले असून लवकरच ही अभ्यासिका सर्वांसाठी खुली करण्यात येईल अशी माहिती नगर परिषदेचे मुख्याधिकारी डॉ. उत्कर्ष गुट्टे यांनी दिली. अंबाजोगाई शहर हे शैक्षणिक दृष्ट्या महत्वाचे शहर असून या शहरातील सर्वसामान्य विद्यार्थ्यांना शहराच्या मध्यवर्ती भागात एक सुसज्ज अभ्यासिका असावी या दृष्टिकोनातून नगर परिषदेच्या जलतरण तलावाच्या शेजारी एक अद्यावत अभ्यासिका निर्माण करण्याचे काम गेली काही वर्षांपासून सुरु होते. मात्र या आभ्यिसिकेच्या कामाला तांत्रिक बाबींमुळे विलंब होत होता.




### आ. नमिता मुंदडा यांनी केला पाठपुरावा

अंबाजोगाई नगर परीषदेच्या वतीने सुरु करण्यात येत असलेल्या ''भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर अभ्यासिका'' चे कामास गती देण्याच्या सुचना आ. नमिता मुंदडा यांनी केल्या होत्या. त्या स्वतः इंटेरियर डिझायनींग या विषयातील उच्च शिक्षित असल्यामुळे त्यांनी ही अभ्यासिका अधिक अद्ययावत, मुलांच्या सोयीची तज्ञ व वैशिष्ट्य पुर्ण कशी होईल या बाबतच्या सुचेना केल्या आहेत. गेली अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेली ही अभ्यासिका सुरू करण्यासाठी आ. नमिता मुंदडा यांनी घेतलेल्या पुढाकाराचे शिक्षणप्रेमी व विद्यार्थी वर्गाकडून स्वागत करण्यात येत आहे.

शहरातील गरजवंत विद्यार्थ्यांची अभ्यासिकेची ही अडचण लक्षात घेऊन नगर परिषदेच्या वतीने सुरु असलेल्या या अभ्यासिकेच्या कामाला गती देण्याच्या सुचना या विभागाच्या आ. नमिता मुंदडा यांनी दिल्यानंतर या अभ्यासिकेचे काम युध्दपातळीवर सुरु करुन हे काम आता पुर्णत्वाकडे गेले असल्याचे त्यांनी सांगितले.भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३३ व्या जयंतीनिमित्त भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर अभ्यासिका'' सुरु करावयाची होती, मात्र या अभ्यासिकेचे काम अजूनही पुर्ण न झाल्याने भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती चे औचित्य साधुन भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर अभ्यासिका'' या फलकाचे अनावरण आज करण्यात येवून लवकरच ही अभ्यासिका सर्वांसाठी खुली करण्यात येणार असल्याचे नगर परिषदेचे प्रशासक तथा मुख्याधिकारी डॉ उत्कर्ष गुट्टे यांनी सांगितले.

# डॉ. आंबेडकरांचे वंचित घटकांसाठी महान कार्य-प्राचार्य धाट

अंबाजोगाई

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी राज्यघटनेच्या माध्यमातून वंचित समाज घटक आणि महिलांच्या उत्थानासाठी खूप मोठे कार्य केले असल्याचे प्रतिपादन सोमवारी (दि.१५) निवृत्त प्राचार्य धाट यांनी येथे केले.येथील खोलेश्वर महाविद्यालयात सांस्कृतिक आणि संगीत विभागाच्या वतीने आयोजित केलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त व्याख्यानात प्रा. धाट बोलत होते.अध्यक्षस्थानी महाविद्यालयीन विकास समितीचे अध्यक्ष रामभाऊ कुलकर्णी हे होते. महाविद्यालयीन विकास समितीचे सदस्य डॉ. प्रवीण जोशी, संगिता धर्मराव, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मुकुंद देवर्षी आदींची उपस्थिती होती.

प्रा. धाट म्हणाले, की शिक्षण हे समाज संघटित करण्याचे साधन असून तत्कालीन काळात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी वंचित समाज घटक आणि महिलांच्या उत्थानासाठी खूप मोठे कार्य केले आहे. आपण केवळ शिक्षण घेवून उपयोगाचे नाही. तर शिक्षणातून मिळालेल्या ज्ञानाची अंमलबजावणी कशी करायची हे आपणास समजले पाहिजे, त्यासाठी समाजात समता, स्वातंत्र्य व बंधुता निर्माण करण्याची आवश्यकता आहे, म्हणून शिक्षण हा संस्कार




आहे आणि शिक्षण हे समाज निर्मितीचे साधन आहे, साध्य नाही, असेही प्रा. धाट म्हणाले.महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर, छत्रपती शिवाजी महाराज यांच्या सारख्या महान व्यक्तींच्या कार्याला स्मरून आपण जर जीवन जगलो तर समाजोन्नती नक्की होईल अशा भावना राम कुलकर्णी यांनी व्यक्त केल्या. प्रास्ताविक प्रा.डॉ. तात्या पुरी यांनी केले. सुत्रसंचालन प्रा. कालिदास चिटणीस यांनी केले. प्रा. शैलेश पुराणिक यांनी आभार मानले. या मुख्य कार्यक्रमापूर्वी सकाळी नऊ ते दहाच्या दरम्यान खोलेश्वर महाविद्यालयाच्या आजी, माजी विद्यार्थ्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनावर आधारित भीमगीतांच्या गायनाचा अतिशय सुरेख व प्रबोधनपर असा कार्यक्रम सादर करून महामानवांना अभिवादन केले. यावेळी क्रांती एडके, प्रतिक्षा भुतकर, मनिषा वैरागे, शाहीर गणेश काळे, बळीराम उपाडे, प्रा. महादेव माने आदींनी गीते सादर केली.

# मासिक निवृत्तीवेतन इ-कुबेर प्रणाली द्वारे होणार जमा

बीड । प्रतिनिधी

शासन स्तरावर निवृत्तीवेतन व कुटुंब निवृत्तीवेतन धारक यांचे निवृत्तीवेतन व इतर लाभ हे कोषागारमार्फत रिझर्व बँकमधून त्यांच्या खात्यात जमा करण्यासाठी इ-कुबेर प्रणाली विकसित करण्यात आली असून त्याद्वारे या पुढील निवृत्ती वेतन, निवृत्ती वेतन विषयक लाभ मिळणार आहेत.बीड कोषागार कार्यालयात निवृत्तीवेतन व कुटुंब निवृत्तीवेतनधारक एकूण १७ हजार ४९८ असून त्यांनी निवृत्तीवेतन सुरू करतेवेळी दिलेला बँक तपशील आधारे त्यांना निवृत्तीवेतन आजपर्यंत जमा करण्यात आलेले आहे. सद्यस्थितीतसी.एम.पी. प्रणालीद्वारे ई.सी.एस.प्रदान पद्धतीमुळे व कोअर बँकिंग असल्यामुळे बँक आय.एफ.एस.सी. कोडची आवश्यकता भासत नव्हती.परंतु आता ई-कुबेर प्रणालीमध्ये बँक आय.एफ.एस.सी. कोड अचूक असणे आवश्यक आहे.

ही कुबेर प्रणालीची अंमलबजावणी करतेवेळी असे निदर्शनास आले आहे की, निवृत्तीवेतनधारक व कुटुंब निवृत्तीवेतनधारक यांनी निवृत्ती वेतन सुरू करतेवेळी जिल्ह्यातील अधिकृत बँकेत खाते उघडल्यावर नंतर ते बँक खाते कोषागार कार्यालयाच्या परस्पर जिल्हयाबाहेरील व जिल्ह्यातील बँकेत वर्ग केल्यामुळे बँक आय. एफ. एस. सी. कोडमध्ये बदल झालेला आहे. ई-कुबेर प्राणालीत बँक शाखा आय.एफ.एस.सी.कोड अचूक असणे बंधनकारक असल्यामुळे बीड कोषागारातून निवृत्तीवेतन व कुटुंब निवृत्ती वेतन घेणाऱ्या निवृत्तीवेतनधारकानी जिल्हयाबाहेर खाते वर्ग केले असल्यास ते खाते बीड जिल्ह्यातील मूळ शाखेत वर्ग करावे व जिल्ह्यांतर्गत शाखा बदल केली असल्यास पूर्वीच्या बँकेचे नादेय प्रमाणपत्रसह नवीन बँक शाखेचे पासबुक प्रथम पृष्ठाची छायांकित प्रत कोषागार कार्यालयास सादर करावी. जेणेकरून नियमित मासिक निवृत्तीवेतन मिळण्यास समस्या निर्माण होणार नाहीत. असे न केल्यास निवृत्तीवेतन जमा होण्याची समस्या निर्माण झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी निवृत्तीवेतनधारकाची राहील याची नोंद घ्यावी, असे आवाहन जिल्हा कोषागार अधिकारी महेश बाब्रस यांनी केले आहे.

# पाटोदा-चुंबळी रस्ता कामासाठी मोजणी होणार

बीड । प्रतिनिधी

उच्च न्यायालय खंडपीठ यांच्या दिनांक ८ मार्च २०२३ रोजीच्या आदेशानुसार तसेच जिल्हाधिकारी बीड यांच्याकडील दिनांक ११ मार्च २०२४ रोजिचे आदेशानुसार मौजे पाटोदा जि. बीड येथील पाटोदा- चुबळी रस्त्याच्या मोजणी कामी उपाधीक्षक भूमी अभिलेख कार्यालयाकडून दिनांक २४ एप्रिल २०२४ ही तारीख निश्चित करण्यात आली आहे. मोजणी अर्जात नमूद लगत धारकास नोटीस देण्यात आलेली आलेली आहे. तसेच तहसीलदार पाटोदा यांच्याकडे दिनांक १३ जानेवारी २०२३ रोजीचे पत्रात कळविल्यानुसार ज्यांची नावे मोजणी अर्जात नमूद नाहीत अशा पाटोदा-चुंबळी रस्त्यालगतच्या सर्व सर्व्हे नंबरच्या हितसंबंधितांना नोटीस देणे आवश्यक आहे.

तरी ज्या सहधारकांना/हित संबंधितांना नोटीस मिळाल्या नसतील अशा सर्व संबंधितांना या नोटीसद्वारे कळविण्यात येते की, त्यांनी वर नेमलेल्या मोजणी तारखेस सकाळी १०.३० वाजल्यापासून काम संपेपर्यंत जाय मोक्यावर हजर राहावे, असे आवाहन भुमी अभिलेखचे उप अधिक्षक एम. के. मुंडे यांनी केले आहे

# बार्टीच्या वतीने जात प्रमाणपत्र पडताळणी मोहिम

बीड । प्रतिनिधी

जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समितीच्या वतीने महासंचालक डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन प्रशिक्षण संस्था,बार्टी पुणे यांच्या परिपत्रकान्वये महात्मा डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंतीच्या अवचित्य साधून सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग अंतर्गत राज्यांमध्ये समता पंधरवडा निमित्त जात प्रमाणपत्र पडताळणीचे विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. समता पंधरवडा राज्यातील इयत्ता ११ वी व १२ वी विज्ञान शाखेतील सन २०२३ -२४ मधील प्रवेशित सर्व मागासवर्गीय विद्यार्थ्यांना जात वैधता प्रमाणपत्र मिळण्यासाठी विशेष मोहिमेचे आयोजन केले आहे. जेणेकरून समितीचे कामकाज अधिक पारदर्शक, लोकाभिमुख व गतिमान व विद्यार्थ्यांना विहित वेळेत वैधता प्रमाणपत्र मिळू शकेल

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतीय राज्यघटनेवर देशाला समता, स्वातंत्र्य, बंधुत्वाने समाजामध्ये एकात्मता निर्माण करण्याचा प्रयत्न केला आहे. राज्यघटनेचे कलम ४६ मध्ये घटनेने समाजातील दुर्बल वंचिता बाबत राज्याची जबाबदारी अत्यंत दूरदर्शीपणांनी व गांभीर्याने नमूद केली आहे. त्याअनुषंगाने राज्यातील अनुसूचित जाती वंचित दुर्बल घटकांच्या सर्वांगीण विकासाचे ध्येय म्हणून विविध कल्याणकारी योजना राज्यभर राबविण्यात येत आहेत. या सर्व योजनांची जनतेला माहिती व्हावी तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार व कार्यांची प्रचार, प्रसिध्दी व्हावी यासाठी शासनाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३३ व्या जयंतीनिमित्त विविध समस्या पंधरवडा कार्यक्रम राबविण्याचे ठरविले आहे. मागासवर्गीय व्यक्तीस शिक्षण सेवा निवडणूक व इतर संवैधानिक लाभ आरक्षणाच्या माध्यमातून प्राप्त करून घेताना जातप्रमाणपत्र हा एक महत्त्वाचा दस्तऐवज आहे. अनेकदा मागासवर्गीय व्यक्तीस विहित कालावधीत जात प्रमाणपत्र न मिळाल्याने त्यांना संविधानिक अधिकारापासून वंचित राहावे लागते असे निदर्शनास आले आहे.

या अनुषंगाने त्याचे शिक्षण हक्क अधिनियम २००९ नुसार शालेय प्रवेशासाठी तसेच पुढील विविध लाभांसाठी जात प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. तथापि मागासवर्गीय बालकामधील अज्ञान व योग्य मार्गदर्शनाचा अभाव इत्यादी कारणामुळे विद्यार्थ्यांना जात प्रमाणपत्र मिळण्यामध्ये अडचणी येतात. विद्यार्थी पालक विहित कालमर्यदेत समितीकडे अर्ज सादर न केल्याने व्यवसायिक अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी विद्यार्थ्यांना व त्यांच्या पालकांना जात वैधता प्रमाणपत्र मिळताना विविध अडचणींना सामोरे जावे लागते तसेच विहित कालावधीत वैधता प्रमाणपत्र सादर न केल्यास विद्यार्थी प्रवेशापासून वंचित राहू नये.

त्यामुळे अनुसूचित जाती, विजाभज इमाव व विमाप्र प्रवर्गातील विज्ञान शाखेचे इयत्ता ११ वी व १२ मध्ये शिकत असलेल्या व्यावसायिक अभ्यासक्रमास प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांनी जात प्रमाणपत्र पडताळणीकरिता समितीकडे विहित कालमर्यादेत अर्ज सादर करावेत. असे आवाहन जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती बीड यांनी केले आहे.

# बोध झाला की दुःख जातेच- महंत नामदेवशास्त्री

बीड । प्रतिनिधी

मृत्यूलोकात मनुष्यास शरीर मिळाले पण ते शरीर तरुण राहावे म्हणून सजविण्यात खूप वेळ दिला जातो समाधान मिळत नाही दुःख मिळते. प्रत्येकाला सुख हवे आहे. यासाठी दुःख विसरणारी क्रिया हवी आहे. बोध झाल्यावर दुःख विसरते. म्हणजेच बोध झाला की दुःख जातेच असे प्रतिपादन न्यायाचार्य महंत नामदेव महाराज शास्त्री श्रीक्षेत्र भगवानगडकर यांनी श्रीक्षेत्र संस्थान रामगड येथे सहावे कीर्तन पुष्पगुंफतांना केले.

आपल्या अभंग निरूपणातून बोलताना हरिभक्तिपरायण न्यायाचार्य नामदेव शास्त्री म्हणाले की, पूर्वी भगवान बाबा नारायण गडावर असताना त्यांनी या गडावर येऊन किसन बाबांना बसवले होते व त्यांना राहण्याकरता येथे माडी बांधलेली होती. या गडाच्या भौतिक व आध्यात्मिक प्रगतीस सध्या योग्य असे योगीराज महाराज रूढ झालेले आहेत. शास्त्री महाराज या अभंगात झणी दृष्टी लागो ,तुझे सगुणपणा, अनंत जन्मीचे विसरलो दुःख असा बोधप्रद तीन चरणाचा नामदेव महाराजांचा विचार मांडतात. जिथे ज्ञान नाही तिथे बोध नाही म्हणून अशा ठिकाणी




प्रेमाने झणी दृष्टी लागो तुझ्या सगुणपणा / तेणे माझ्या मना बोध केला/. मन हे चंचल आहे. त्यानेच तर दुःख आहे .ते स्थिर झाल्यावर व ते स्थिर होण्यासाठी आपली दृष्टी त्याच्या सगुणपणावर लावावी. त्याने आपणास बोध-ज्ञान होते. शरीराचा विसर पडतो. शरीर आहे तोपर्यंत दुःख आहे. अहंपणाने दुःख आहे. अहंपणा हा दृष्टी लावल्यावर जातो .संत हे सगुण भक्ती देतात. त्यातून बोध होतो व त्या बोधानेच दुःख हे विसरले जाते. प्रपंचात मात्र आपण सर्व गोष्टी लक्षात घेतो, विसरत नाही म्हणून दुःख भोगतो. संतांच्या सानिध्याने अंतरात्म्याला प्रेरणा मिळून जो योगी यांच्या ध्यानात येत नाही असा परमात्मा आमच्या मागेपुढे उभा राहतो व आमचे सर्व आघात, दुःख नाहीसे करतो. यातून आमची अनंत जन्माचे दुःखे जातात. दुःख संपूर्णतः विसरले जाते. त्याच्या नावावर प्रेम ठेवल्यामुळे व आमच्या शरीराची दृष्टी त्याच्या सगुणपणावर लावल्याशिवाय दुःख जाणे नाही म्हणून ते सर्वांना- या रे या रे लहान थोर /याती भलते नारी नर/ करावा विचार/ नलगे निंदा कोणाची/ असा समस्टीचा विचार करतात. असेही ते यावेळी म्हणाले.

यावेळी महंत हरिभक्ती परायण स्वामी योगीराज महाराज मठाधिपती श्रीक्षेत्र रामगड, मसुराम महाराज कदम, दिलीप अण्णा गोरे शामरावजी पडूळे, रामहरी रसाळ गुरुजी विभागीय प्रवक्ता, अनंत घीगे जिल्हा प्रसिद्धीप्रमुख अखिल भारतीय वारकरी मंडळ, चिंतामण महाराज मोरे, त्रिंबक महाराज घोडके, शामराव महाराज कुटे, मारुती महाराज कथले, संचलनक सिद्धेश्वर महाराज गायके. गायक म्हणून सदाशिव महाराज झणझणे, आदिनाथ महाराज सटले, राजेंद्र महाराज सावंत , बाळासाहेब महाराज मोरे, शिवाजी महाराज नेवडे ,बलभीम महाराज गवंडे, महारुद्र महाराज गवंडे ,उत्तरेश्वर महाराज पूर्भे, रामभाऊ महाराज वाखुरे ,पंडित महाराज खोड, भाऊसाहेब महाराज पिसाळ चोपदार. आणि मृदंगमणीम्हणून प्रमोद महाराज पद्? मुले, रघुराज महाराज ढोबळे, ज्ञानेश्वर महाराज मोरे, गणेश महाराज आमटे, रमेश महाराज पिसाळ व बाजीराव काळे आणि पन्नास हजाराच्या वर भाविक भक्त उपस्थित होते.

# शेतकऱ्यांना विनाअट तत्काळ नुकसान भरपाई देण्यात यावी- गणेश बजगुडे

बीड । प्रतिनिधी

गेल्या काही दिवसात बीड जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात वादळी वाऱ्यासह, अवकाळी पाऊस, गारपीठ झालेली असुन यामुळे जिल्ह्यातील शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान झालेले आहे. प्रशासनाकडून पंचनाम्याच्या नावावर वेळकाढू पणाचे धोरण आखले जात असुन असले पंचनाम्याचे गुऱ्हाळ बंद करुन शेतकऱ्यांना तत्काळ विनाअट नुकसान भरपाई देण्याची मागणी बीड तालुका काँग्रेस कमिटीच्या वतीने तालुकाध्यक्ष गणेश दादा बजगुडे पाटील यांनी केली आहे.



जिल्ह्यात आंबा, डाळिंब, टरबुज, पपई, टोमॅटो, मिरची, यासह फळबाग, भाजीपाला, उन्हाळी बाजरी यासारखे हातातोंडाशी आलेली पीके निस्तनाबुत झालेली आहेत. जगाचा पोशिंदा असलेला शेतकरी राजा अगोदरच संकटात असताना पुन्हा या नैसर्गिक आपत्तीमुळे बळीराजा हावलदिल झालेला आहे. अनेक ठिकाणी शेतकऱ्यांच्या घराचे व गुराढोरांच्या गोठ्याचे देखील मोठ्या प्रमाणात नुकसान झालेले आहे. प्रशासनाकडून पंचनाम्याच्या नावावर वेळकाढू पणा केला जात असताना लोकसभेच्या निवडणुकीत दंग असलेल्या नेत्यांना शेतकऱ्याच्या अडचणीत किंवा त्यांच्या संकटात पाठबळ देण्यासाठी वेळ दिसत नाही. मायबाप सरकारने मोठ मोठी भाषणे आणि घोषणा करण्यापेक्षा आज हवालदिल झालेल्या बळीराजाला तत्काळ विनाअट आर्थिक मदत करावी अशी मागणी बीड तालुका काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष गणेश बजगुडे पाटील यांनी केली आहे.



# पंकजाताई मुंडेंच्या झंझावती दौऱ्याने धारूर डोंगर पट्ट्यात कमळाचे वादळ

## ताई, तुम्ही चिंता करू नका शंभर टक्के मतदान देऊ; विविध गावच्या ग्रामस्थांनी दिला शब्द

तेलगाव । प्रतिनिधी

भाजपा महायुतीच्या उमेदवार पंकजाताई मुंडे यांनी निवडणूक प्रचारार्थ आज धारूर डोंगर पट्ट्यात झंझावती दौरा केल्याने कमळाचे वादळ गावा-गावात निर्माण झाले. हिंगणी खुर्द ते चारदरी पर्यंत एका दिवसात तब्बल १२ गावांचा दौरा केला. ठिक-ठिकाणी उत्स्फुर्त स्वागत करताना फटाक्यांची आतिशबाजी गुलाल, पुष्पांची उधळण अनेक गावात महिलांनी औक्षण करून त्यांना शुभेच्छा दिल्या. दरम्यान जाती-पातीच्या भिंती उभा करणार्‍यांच्या मागे जावू नका माझे राजकारण केवळ जनसामान्यांच्या विकासासाठी आहे. मला तुम्ही मतदान रूपी कर्ज द्या, विकासाची महागंगा आणून परतफेड केल्याशिवाय राहणार नाही. पंतप्रधानपदी पुन्हा नरेंद्र मोदी हेच नेतृत्व बसणार त्यामुळे हक्कानं जिल्ह्याचं भाग्य उजळण्यासाठी मी रात्रंदिवस केवळ विकास योजना घेवून आल्याशिवाय राहणार नाही. विकासासाठी लढणारा शिपाई मी असून सेवकाच्या भूमिकेत आहे. संधी मिळाल्यानंतर हक्काची खासदार म्हणून सेवा करणार असल्याचे त्यांनी सांगितले.

दौर्‍यात सोबत असणारे भाजपा नेते रमेश आडसकर, राष्ट्रवादी अजितदादा गटाचे जयसिंग भैय्या सोळंके आणि भाजपा नेते मोहन जगतापांनी बोलताना सांगितले की, ताई हे नेतृत्व केवळ विकासाचं असून जाती-पातीचं राजकारण कोणीच करता कामा नये शंभर टक्के बुथ आम्ही तुमच्या पाठीमागे उभा करून दाखवू असा दावा केला.

महायुतीच्या उमेदवार पंकजाताई मुंडेंनी आज दिवसभर धारूर डोंगर पट्ट्यातील हिंगणी (खु.), हिंगणी (बु), कांदेवाडी, कासारी, बोडखा, भोगलवाडी, गावंदरा, आंबेवडगाव, चौंडी, सोनीमोहा, जहांगीर मोहा, चारदरी आदी गावात झंझावती दौरा करत ग्रामिण भागातील मतदारांची मने जिंकली. प्रत्येक गावात उत्स्फुर्त स्वागत लोकांनी केले. विशेष म्हणजे त्यांना आशिर्वाद देण्यासाठी महिलांची गर्दी मोठ्या प्रमाणावर दिसून आली. ताई, आम्ही तुम्हाला शंभर टक्के मतदान करून दाखवू असा निर्धार ग्रामस्थांनी बोलून दाखवला. दौर्‍यात कुठेही जाती-पातीचा रंग दिसला नाही. मराठा गावात उत्स्फुर्त स्वागत आणि ग्रामस्थांची चेहरे शंभर टक्के मतदान देवू असे



दिसून आले.

याप्रसंगी ठिक-ठिकाणी बोलताना पंकजाताई म्हणाल्या,मी तुमच्याकडे आशीर्वाद मागण्यासाठी आले आहे. उमेदवार म्हणून योग्य वाटते का? असा सवाल करताच सभेतून आलेला हो.. हा माझ्यासाठी उत्साह वाढविणारा आहे. सर्वोच्च नेत्यांनी मला निवडणूक लढविण्याचा आदेश दिला. पालकमंत्री असताना गावच्या सरपंचाला देखील कधी मी त्रास दिला नाही. प्रत्येक गावात माझ्या विकासाच्या योजना पोहोंचल्या असून मी नेहमीच शुद्ध कर्माने राजकारण करत आले. सामान्य माणसाच्या हक्काचे रक्षण माझ्या हातून नेहमीच झालं. घरकुल वाटपात देखील कधी भेदभाव केला नाही. मुंडे साहेबांच्या पुण्याईमुळे राजकीय प्रतिष्ठा माझी मोठी असून अंबानी, अदानी उद्योगपतींकडून आपल्या जिल्ह्यात एखादा मोठा उद्योग घेवून येईल आणि दहा हजार बेरोजगारांना रोजगार उपलब्ध करून देईल. कॅन्सर सारखं आधुनिक हॉस्पिटल मला जिल्ह्यात उभा करून सामान्य जनतेच्या आरोग्याच रक्षण मला करायचं आहे. पालकमंत्री पदाच्या काळात हजार कोटी पेक्षा जास्त शेतकर्‍यांना विमा मिळवून दिला. सर्व प्रकारचे अनुदान रोज बँकेत जमा व्हायचे ही माझ्या शुद्ध कर्माची पुण्याई असल्याचे सांगुन आता चांगली नितीमत्ता आणि प्रामाणिक राजकारण करणार्‍या नेतृत्वाला संधी द्या. शेतकर्‍यांचे प्रश्न असो किंवा सामान्य जनतेचे मी संसद गाजवल्याशिवाय राहणार नाही. जाती-पातीचं राजकारण माझ्या रक्तात कधीच नाही. त्यामुळे आपल्या जिल्ह्याच भाग्य उजळण्यासाठी मला तुम्ही मतदान रूपी कर्ज द्या मी विकासाच्या रूपाने परतफेड केल्याशिवाय राहणार नाही. असे त्यांनी सांगितले. या दौर्‍यात भाजपाचे प्रवक्ते राम कुलकर्णी, निर्मळ तात्या, राजेभाऊ मुंडे, बालासाहेब तिडके, नंदकुमार सोळंके, संजयराव सोळंके, दिपक सोळंके, बिभिषण शेंडगे, मधुकर माने, शिवाजी मुंडे, बालासाहे चोले, दिलीप सोळंके, छगनबप्पा सोळंके, सोमनाथ बडे, सुग्रीव तिडके यांच्यासह महायुतीच्या सर्व घटक पक्षाचे प्रमुख कार्यकर्ते ठिक-ठिकाणी उपस्थित होते. एकाच झंझावती दौर्‍याने डोंगरपट्ट्यात पंकजाताईंची हवा निर्माण झाली असून कमळ एके कमळ आणि शंभर टक्के बुथ अस चित्र दिसून आले.

### आडसकर, सोळंके, जगतापांचे आवाहन

भाजपा नेते रमेश आडसकर, राष्ट्रवादी अजित पवार गटाचे जयसिंग भैय्या सोळंके, विधानसभा प्रमुख मोहन जगताप भाषणात म्हणाले की, जाती-पातीच राजकारण करणार्‍या विरोधकांच ऐकून आपलं नूकसान होवू शकतं. लोकसभा निवडणूक राष्ट्रीय प्रश्नावर असून सत्तर वर्षात जेवढा विकास झाला नाही. पालकमंत्री म्हणून पंकजाताईंनी आपल्या जिल्ह्याचा चेहरा मोहरा बदलून टाकला. निवडणूकीनंतर हे नेतृत्व केंद्रात मंत्री होणार ज्यामुळे विकासाची गंगा जिल्ह्यात येवू शकते. बजरंग सोनवणे हे उमेदवार धोकाधडी करणारे असून मागच्या निवडणूकीत पाच लाख मते मिळाली. पण हा माणूस कुठल्या बिळात लपून बसला असा सवाल त्यांनी केला. जनतेच्या सुख दुखात कधीच न येणार्‍या सोनवणेंना आता मतदान मागण्याचा अधिकार नसल्याचे यांनी सांगितले.

# बजरंग सोनवणेंनी रुग्णालयात जाऊन अमोल खुणेंची भेट घेतली

### हल्लेखोरांना तात्काळ अटक करण्याची मागणी

गेवराई । प्रतिनिधी

मराठा आरक्षण योद्धा मनोज जरांगे पाटील यांचे सहकारी अमोल खुणे यांच्यावर झालेल्या भ्याड हल्ल्यानंतर मंगळवारी महाविकास आघाडीचे उमेदवार बजरंग सोनवणे यांनी गेवराईच्या रुग्णालयात जाऊन त्यांची भेट घेतली. हल्लेखोरांना तात्काळ अटक करण्याची मागणी ही सोनवणे यांनी केली आहे.



मराठा आरक्षण योद्धा मनोज जरांगे पाटील यांचे सहकारी व कोपर्डी बलात्कार प्रकरणातील आरोपींना न्यायालयाच्या आवारात चोप देणारे अमोल खुणे यांच्यावर सोमवारी (दि.१५) रात्री ७.३० वाजेच्या सुमारास अज्ञात तीन ते चार इसमांनी दगडफेक करीत भ्याड हल्ला केला. त्यानंतर हल्लेखोर पसार झाले. त्यांच्यावर गेवराईच्या शासकीय रुग्णालयात उपचार सुरू असताना मंगळवारी महाविकास उमेदवार बजरंग सोनवणे यांनी अमोल खुणे यांची रुग्णालयात जाऊन भेट घेत तब्येतीची विचारपूस केली. तर उपचार करणाऱ्या डॉक्टरांशी भेटून उपचार व त्यांच्या प्रकृती विषयी माहिती जाणून घेतली. या हल्ल्याचा निषेध करीत या प्रकरणाची चौकशी करून हल्लेखोरांना तात्काळ अटक करण्यात यावी अशी मागणी ही बजरंग सोनवणे यांनी केली आहे.यावेळी त्यांच्या सोबत पूजा मोरे, बालासाहेब जाधव, मुकुंद कणसे, कपिल मस्के, नवनाथ अंबाड यांच्यासह अनेक कार्यकर्ते उपस्थित होते.

# ॲड. प्रकाश आंबेडकर यांचे अकोल्यात अशोक हिंगे यांनी घेतले आशीर्वाद

अकोला । प्रतिनिधी

बीड लोकसभा वंचित बहुजन आघाडीची उमेदवारी जाहीर झाल्यानंतर पहिल्यांदाच अकोला येथे वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष ॲड प्रकाश आंबेडकर यांची मराठवाडा अध्यक्ष अशोक हिंगे पाटील यांनी अकोला येथील यशवंत निवासस्थानी भेट घेऊन आशिर्वाद घेतले.



ॲड.प्रकाश आंबेडकर यांच्यासोबत मराठवाड्यातील लोकसभा मतदारसंघा बाबत याप्रसंगी चर्चा केली. त्यावेळी ॲड.प्रकाश आंबेडकर यांनी मराठवाड्यातील सर्व लोकसभा मतदारसंघातील सर्व उमेदवाराचे ऐ.बी.फॉर्म अशोक हिंगे पाटील यांच्याकडे सुपर्द केले. यावेळी अशोक हिंगे यांनी स्वतःचा उमेदवारी अर्ज भरण्यासाठी ॲड.प्रकाश आंबेडकर यांनी यावे असा आग्रह धरला त्यावर त्यांनी येण्याचे मान्य केले आहे. यावेळी त्यांच्या सोबत बीड जिल्हाध्यक्ष शैलेश कांबळे,ज्ञानेश्वर कवठेकर, बालाजी जगतकर,अजय सरवदे पदाधिकारी उपस्थित होते.

# आ. कैलास पाटील यांना भरसभेत उष्माघाताने भोवळ

धाराशिव । प्रतिनिधी

धाराशिव-कळंब मतदारसंघाचे शिवसेनेचे (ठाकरे) आमदार कैलास घाडगे-पाटील यांना मंगळवार दि. १६ एप्रिल रोजी दुपारी सभा सुरू असताना उष्माघाताचा (हिटस्ट्रोक) त्रास झाला. त्यांना चक्कर येऊन भोवळ आल्याने ते खाली कोसळले. याप्रसंगी उपस्थित कार्यकर्त्यांनी प्रसंगावधान राखत त्यांना धाराशिव शहरातील खासगी रूग्णालयात दाखल केले. सध्या त्यांची प्रकृती स्थिर असल्याचे तेथील डॉक्टरांनी सांगितले.



मंगळवारी दि. १६ रोजी धाराशिव जिल्ह्यात उन्हाचा पारा ४२ अंशावर होता. कडक उन्हाच्या तडाख्यात धाराशिव लोकसभा मतदारसंघाचे महाविकास आघाडीचे उमेदवार ओमराजे निंबाळकर यांचा उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी मंगळवारी धाराशिव शहरातून मोठी रॅली काढण्यात आली होती. जिल्हाधिकारी कार्यालयात उमेदवारी अर्ज दाखल केल्यानंतर नगर परिषदेच्या प्रांगणात महाविकास आघाडीची सभा झाली. या सभेला माजी वैद्यकीय शिक्षणमंत्री अमित विलासराव देशमुख, युवासेना नेते आ. आदित्य ठाकरे, राष्ट्रवादीचे (शरद पवार) युवानेते रोहित पवार, लोकसभा उमेदवार ओमराजे निंबाळकर, आ. कैलास पाटील, माजी आ. राहुल मोटे, शिवसेना संपर्क प्रमुख शंकरराव बोरकर, जीवनराव गोरे आदी नेतेमंडळी उपस्थित होते. दरम्यान, आ. कैलास पाटील यांना उष्माघाताचा त्रास जाणवू लागल्याने त्यांना चक्कर येऊन भोवळ आली व खाली कोसळले. त्यांना कार्यकर्त्यांनी तातडीने रुग्णालयात दाखल केले. त्यांच्यावर उपस्थित डॉक्टरांनी उपचार केले. त्यांची प्रकृती स्थिर असून काळजी करण्याचे कारण नाही. जागरण व उष्णतेमुळे हा प्रकार घडल्याचे डॉक्टरांनी सांगितले. त्यांना सध्या काही दिवस आरामाची गरज असल्याचे सांगितले. हा उष्माघाताचा प्रकार असून काळजी घेण्याचा सल्ला दिला. दरम्यान, शिवसेनेच्या कार्यकर्त्यांनी रूग्णालयात गर्दी केली होती.

# पंकजाताई मुंडेंना मतदान करण्यासाठी परळीत मतदारांमध्ये दिसून आला उत्साह

परळी वैजनाथ । प्रतिनिधी

बीड लोकसभा मतदारसंघातील भाजपा महायुतीच्या अधिकृत उमेदवार पंकजाताई मुंडे यांच्या प्रचाराला सर्वत्रच उत्स्फूर्त प्रतिसाद लाभत असून परळी शहरातील महायुतीचे कार्यकर्ते जोरदारपणाने प्रचार करताना दिसून येत आहेत. शहरातून पंकजाताईंना विक्रमी मताधिक्य देण्याचा निर्धार परळीकरांनी केला आहे.

महायुतीच्या उमेदवार पंकजाताई मुंडे यांच्या प्रचारार्थ शहरात आज सकाळी हनुमान मंदिर मोंढा मार्केट येथून प्रचार फेरी सुरु होवून हालगे गल्ली,गांधी मार्केट,हमालवाडी हिंद नगर,भवानी नगर,मोंढा मार्केट आदी भागात प्रचारफेरी काढण्यात आली. प्रचारफेरीला मतदारांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. महायुतीने परळी शहरात पस्तीस हजाराहून अधिक मताधिक्याचे उद्दिष्ट ठेवले असून नागरिकांमध्ये पंकजाताई यांना मतदान करण्यासाठी मोठा उत्साह दिसून येत आहे.पंकजाताईंच्या विजयात परळी शहराचे निश्चित मोठे योगदान असणार आहे. या निवडणुकीत महायुतीतीला अभूतपूर्व यश प्राप्त होणार आहे. आजच्या या प्रचार फेरीत भाजप, राष्ट्रवादी,शिवसेना व घटक पक्षाचे नेतेगण, महिला पदाधिकारी,कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.





महायुतीच्या प्रचार रॅलीला परळीत उत्स्फूर्त प्रतिसाद

# भारतीय जवान किसान पार्टी व शेतकरी संघटनेकडून बीड लोकसभा निवडणूक लढवणार-अंकुश खोटे

आष्टी । प्रतिनिधी

भारतीय जवान किसान पार्टी आणि शेतकरी संघटना या युतीतर्फे संपूर्ण देशभर लोकसभा निवडणुकीमध्ये उमेदवार उभे करणार असून बीड लोकसभा मतदार संघांमध्ये भारतीय जवान किसान पार्टी आणि शेतकरी संघटना या युतीचे उमेदवार म्हणून आपण बीड लोकसभा मतदार संघातुन निवडणूक लढविणार आहोत अशी माहिती महाराष्ट्र राज्याचे त्रिदल सैनिक सेवा संघ संस्थापक अध्यक्ष अंकुश रामभाऊ खोटे यांनी दिली.



आष्टी येथील त्रिदल सैनिक सेवा संघ कार्यालयामध्ये पत्रकारांशी संवाद साधताना ते बोलत होते. यावेळी त्यांच्यासोबत त्रिदल सैनिक सेवा संघाचे महाराष्ट्र राज्याचे सचिव नवनाथ झगडे,सहसचिव बबन दहिफळे,आष्टीचे शहराध्यक्ष श्रीराम माने, आष्टी तालुकाध्यक्ष नवनाथ भगत,संचालक मनीष नरवडे, संचालक जनार्दन धनवडे, कैलास पारखे आदि उपस्थित होते.

उमेदवारीबाबत अधिक माहिती देताना अंकुश खोटे पुढे म्हणाले की, शेतकरी संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष रघुनाथदादा पाटील आणि भारतीय जवान किसान पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष नारायण अंकुशे यांचे मार्गदर्शनाखाली भारत देशामध्ये ३४८ लोकसभा मतदार

संघांमध्ये उमेदवार उभे करण्यात येणार आहेत. महाराष्ट्र राज्यामध्ये २२ लोकसभा मतदारसंघांमध्ये या युतीतर्फे उमेदवार उभे करण्यात येणार आहेत अशी माहिती देऊन स्वतःविषयी बोलताना अंकुश खोटे म्हणाले की, आपण १९८४ ते २०१० या कालावधीमध्ये सैन्य दलामध्ये देशसेवा केलेली आहे. या कालावधीमध्ये हिमाचल प्रदेश,लेह, जम्मू-काश्मीर,सिक्कीम, राजस्थान,अरुणाचल प्रदेश,उत्तर प्रदेश या ठिकाणी काम केलेले आहे. त्रिदल सैनिक सेवा संघ या संघटनेच्या महाराष्ट्रभर ९३६ ठिकाणी शाखा कार्यरत असून या संघटनेतर्फे शहीद वीर माता,वीर पत्नी, माजी सैनिकांच्या समस्या सोडवण्याचे अखंडपणे काम सुरू आहे.आजवर ८६४ माजी सैनिकांच्या समस्यां आम्ही संघटनेद्वारे सोडवल्या आहेत असे सांगितले. भारतीय राजकारणामध्ये जय जवान जय किसान मिशन - ५४३ लोकसभा अंतर्गत भारतीय जवान किसान पार्टी आणि शेतकरी संघटना यांचे संयुक्त उमेदवार म्हणून भारतीय राजकारणामध्ये बदल घडवणार आहोत.

# सांगलीत आघाडी धर्म पाळा, वरिष्ठांच्या सूचना- विश्वजीत कदम

नागपूर । प्रतिनिधी

काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, बाळासाहेब थोरात यांनी आम्हाला तात्काळ चर्चेसाठी नागपुरात बोलावल्याने मी आलो. काँग्रेस प्रभारी रमेश चेन्निथला यांच्यासोबतही फोनवरून चर्चा झाली. यातून लवकर तोडगा काढावा, जेणेकरून सांगली लोकसभेत महाविकास आघाडीच्या कार्यकर्त्यांना एक ठोस पाऊल घेता येईल, अशी भूमिका आम्ही मांडली, असे प्रतिपादन काँग्रेस नेते व माजी मंत्री विश्वजित कदम यांनी माध्यमांशी बोलताना केले.



सांगलीत विशाल पाटील यांनी अर्ज दाखल केला असून काँग्रेस पक्षाचा एबी फॉर्म जोडला नाही. मात्र, शेवटच्या क्षणालाही एबी फॉर्म जोडला जाऊ शकतो. माझ्या माहितीप्रमाणे त्यांनी दोन अर्ज भरले आहेत. एक काँग्रेस पक्ष आणि एक अपक्ष, राज्याच्या आणि देशाच्या ज्येष्ठ नेत्यांची जबाबदारी आहे. सांगली जिल्ह्याचा आमदार म्हणून आम्ही सातत्याने प्रामाणिक प्रयत्न केले आहेत. सांगली जिल्ह्याची जागा काँग्रेसला मिळावी, त्यासाठी शेवटच्या क्षणापर्यंत आम्ही प्रयत्न केला. पण सध्या सांगलीची परिस्थिती उद्भवली आहे, त्याला सगळे आपण साक्षीदार आहोत. महाराष्ट्रात महाविकास आघाडीसाठी अत्यंत चांगले वातावरण आहे. यासाठी काय योग्य निर्णय घ्यायचे ते ज्येष्ठांनी ठरविणे गरजेचे आहे. दरम्यान, वंचित बहुजन आघाडीचे अनेक प्रयोग महाराष्ट्रात सुरू आहेत. यातून काय घडतं ते त्या त्या निवडणुकीचा शेवटच्या क्षणापर्यंत कळत असते. त्यामुळे मी यावर जास्त बोलणार नाही. मी जी काही परिस्थिती मांडली आहे. त्यातून राज्याचे आणि देशाचे नेते नक्कीच मार्ग काढतील. महाराष्ट्राच्या हितासाठी महाविकास आघाडी धर्म पाळायला पाहिजे, अशा सूचना काल आमच्या वरिष्ठांनी आम्हाला दिल्या आहेत, असे कदम यांनी सांगितले.

# ४०० पारच्या पोकळ गप्पा मारणाऱ्यांचे २०० चे वांदे, अतुल लोंढे यांची खोचक टीका

नागपूर । प्रतिनिधी

भारतीय जनता पक्षाने 'अब की बार ४०० पार'चा जो नारा दिला आहे, तो केवळ हवा निर्माण करण्यासाठी असून भाजपाचा दारुण पराभव होणार यात तिळमात्र शंका नाही. भारतीय जनता पक्षाच्या उमेदवारांनाही त्याची जाणीव आहे. अमरावती लोकसभा मतदारसंघाच्या भारतीय जनता पक्षाच्या उमेदवार नवनीत राणा यांनी जाहीर सभेतच 'मोदींची हवा नाही, हवेत उडू नका' हे सांगून वस्तुस्थितीवर शिक्कामोर्तब करत भाजपाच्या फुग्यातील हवा काढल्याचा हल्लाबोल प्रदेश काँग्रेस प्रवक्ते अतुल लोंढे यांनी केला.

यासंदर्भात बोलताना अतुल लोंढे म्हणाले की, भाजपाच्या उमेदवार व विद्यमान खासदार नवनीत राणा यांनी त्यांच्या प्रचार सभेतच मोदींची हवा नसल्याचे स्पष्ट केले. २०१९ साली मोदींची हवा असतानाही अमरावतीतून अपक्ष म्हणून निवडून आले,



मोदींची हवा आहे, या फुग्यात राहू नका असेच बजावले आहे. नवनीत राणा यांना वस्तुस्थिती समजलेली आहे. परंतु देवेंद्र फडणवीस व प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांना मात्र हे समजलेले नाही, ते अजूनही हवेतच आहेत. मोदींचे नाणेच खणखणीत आहे, यावर या दोन नेत्यांचा अद्याप विश्वास आहे. २००४ साली सुद्धा 'इंडिया शायनिंग' आणि 'फिलगुड'च्या हवेत असलेल्या व अटलबिहारी वाजपेयी, लालकृष्ण अडवाणींच्या सत्तेला सोनिया गांधी यांनी सुरुंग लावून सत्तेतून बाहेर कसे केले हे भाजपाला कळले नाही. पुढे बोलताना अतुल लोंढे म्हणाले की, दरवर्षी २ कोटी नोकऱ्या, शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करणार, शेतमालाला दीडपट हमी भाव देणार, प्रत्येकाच्या खात्यात १५ लाख रुपये देणार, अशी आश्वासने २०१४ साली मोदींनी दिली होती, ती पूर्ण केलेली नाहीत, याचा जनतेत प्रचंड राग आहे. सुधीर मुनगंटीवार, अनुज धोत्रे या भाजपा उमेदवारांना जनतेने जाब विचारला. मागील १० वर्षात काय केले असे प्रश्न जनता विचारत आहे. अनेक गावात भाजपाचे उमेदवार व नेत्यांना हाकलून दिले जात आहे, ही वस्तुस्थिति आहे. मोदींची गॅरंटी सुद्धा देवेंद्र फडणवीस यांच्या मी पुन्हा येईन सारखीच फसवी आहे. ते जरी पुन्हा आले तरी त्यांचा राजकीय आलेख घसरला आहे, एकनाथ शिंदेंच्या हाताखाली त्यांना काम करावे लागत आहे, अशी टीकाही यावेळी केली.

### सरकारी यंत्रणांचा कितीही वापर केला तरी पराभव अटळ

देशात भाजपा व मोदी विरोधी हवा आहे. मोदींनी कितीही प्रयत्न केले, ईडी, सीबीआय, इन्कम टॅक्स, निवडणूक आयोगाचा कितीही गैरवापर केला तरी भाजपाचा पराभव अटळ आहे. भाजपाच्या अनेक नेत्यांना त्याची जाणीव झाली तशीच नवनीत राणा यांनाही झाली आहे. काहीही असो भाजपाचे काऊंटडाऊन सुरु झालेले असून लोकसभा निवडणुकीत या हुकूमशाही सरकार पराभव होऊन जनतेच्या विश्वासाचे नवीन सरकार येण्यापासून आता कोणीही रोखू शकत नाही, अशी आशाही यावेळी व्यक्त केली.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske, Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# बोगस बियाणे, खते, बोगस किटकनाशक प्रकरणात गुन्हे दाखल करा- डॉ. सुहास दिवसे

पुणे । प्रतिनिधी

आगामी खरीप हंगामात शेतकऱ्यांना बि-बियाणे, खते, किटकनाशकांच्या पुरेशा उपब्धतेवर लक्ष द्यावे; बोगस बियाणे, खते, बोगस किटकनाशके बाजारात येऊ नये यासाठी अशा प्रकरणात तातडीने गुन्हे दाखल करत कठोर कारवाई करावी, असे निर्देश जिल्हाधिकारी डॉ. सुहास दिवसे यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित जिल्हा खरीप हंगामपूर्व आढावा बैठकीत ते बोलत होते. यावेळी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी संतोष पाटील, विभागीय कृषि सहसंचालक रफिक नायकवडी, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी संजय काचोळे आदी उपस्थित होते.



पुणे जिल्हा खरीप हंगामपूर्व आढावा बैठक संपन्न

भारतीय हवामान शास्त्र विभागाने यावर्षी सरासरीपेक्षा अधिक म्हणजेच चांगल्या पावसाचा अंदाज व्यक्त केला असून ही बाब समाधानाची आहे, असे सांगून डॉ. दिवसे म्हणाले, पुणे जिल्ह्यात संसाधनांची कमतरता नाही तसेच शेतकरीही प्रगतीशील आणि कल्पक आहेत त्यामुळे विभागाने कृषी विकासासाठी लघुकालीन आणि दीर्घकालीन कार्यवाहीकडे लक्ष द्यावे. बियाणे, किटकनाशकांच्या बाबतीत जिथे तक्रार येईल तिथे लगेच तपासणी, अहवाल करत गुन्हे दाखल करावेत. नैसर्गिक शेतीचे प्रमाणीकरण आणि त्यासाठी परिसंस्था निर्माण केल्याशिवाय नैसर्गिक शेतीला चालना मिळणार नाही. त्यादृष्टीने प्रयत्न करावेत.

खत निर्मिती कंपन्यांनी कोणत्याही परिस्थितीत बफर साठ्यासाठी त्यांना निश्चित करुन दिलेला पुरवठा करावा. खतांच्या वाहतुकीबाबत योग्य ते नियोजन करावे. युरिया खताच्या पुरवठ्याबाबत नियोजन करावे, अशाही सूचना त्यांनी दिल्या.खरीपातील सर्व पिकांच्या बियाणे उपलब्धतेबाबत आढावा घेऊन सोयाबीन लागवडीला चालना देताना घरचे बियाणे वापरण्यासाठी शेतकऱ्यांना प्रोत्साहित करावे, असे जिल्हाधिकाऱ्यांनी सांगितले.

शेतीमध्ये अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब करण्याची गरज आहे. महात्मा गांधी ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत पडीक जमिनीवर बांबू लागवडीचा उपक्रम चांगला असून त्याचे मार्केट लिंकेज केल्यास शेतकरी बांबू लागवडीस पुढे येतील.

पारंपरिक दृष्टीकोनातून बाहेर येत फळबागांमध्ये सर्वसाधारण भागांमध्ये पेरु तसेच पुरंदर आदी भागांमध्ये सीताफळ, अंजीर जिथे शक्य तेथे ड्रॅगनफ्रुट लागवडीवर भर दिल्यास शेतकऱ्यांना फायदेशीर होईल. कमी धोका घेत एक्झॉटिक भाजीपाल्याच्या लागवडीलाही चालना देता येईल. शेतकऱ्यांना शाश्वत पिके घेण्यास प्रोत्साहित करावे, असेही ते म्हणाले.पुणे, मुंबईसारखी मोठी बाजारपेठ जवळ असताना दर्जेदार कृषीमालाला मोठी मागणी आहे. कृषीमाल निर्यातीबरोबरच देशांतर्गत व जवळच्या मोठ्या बाजारपेठांसाठी दर्जेदार शेतमाल, फळे, भाजीपाला कृषीमाल पुरवल्यास त्याचा आर्थिक लाभ शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणात होईल हे शेतकऱ्यांना पटवून दिले पाहिजे.

पीक कर्जवाटपात पुणे जिल्ह्याने अतिशय उत्कृष्ट कामगिरी केली असून पुढेही अशीच कामगिरी राहील असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. श्री. नायकवडी यांनी भाजीपाला आणि फळांच्या निर्यातीलसाठी व्हेजनेट आणि फ्रुटनेट सुविधेबाबत माहिती दिली. खते कंपन्यांनी विभागाच्या सूचनेनुसार आवश्यक तेथे खतांचा पुरवठा करावा, असेही त्यांनी सांगितले.यावेळी श्री. काचोळे यांनी सादरीकरणात सांगितले, जिल्ह्यात खरीपाचे क्षेत्र सुमारे २ लाख हेक्टर आहे. गेल्या तीन हंगामात सुमारे ३० हजार क्विंटल बियाण्यांची विक्री झाली असून यावर्षी ३६ हजार क्विंटलच्या मागणीनुसार पुरवठ्याचे नियोजन करण्यात आले आहे. यावर्षी आवंटनानुसार खताचा पुरवठा होत आहे. युरियाची होणारी मागणी पाहता शासनाने जिल्हा प्रशासनाच्या मागणीनुसार जिल्ह्यात खतांचा १० हजार ३३० मे. टन. संरक्षित साठा (बफर स्टॉक) करण्यास मान्यता मिळाली आहे. त्यानुसार युरियाचा ९ हजार ४६० मे. टन आणि डीएपीचा ८७० मे. टनचा बफर साठा करण्यात येणार आहे, असे त्यांनी सांगितले. यावेळी प्रधानमंत्री पीक विमा योजना, पीएम- किसान योजनेची ई-केवायसी, निविष्टा गुणवत्ता नियंत्रण, कृषी यांत्रिकीकरण, फळबाग लागवड, राष्ट्रीय कृषी सिंचन योजना, राष्ट्रीय फलोत्पादन अभियान, मुख्यमंत्री शाश्वत कृषी सिंचन योजना, कृषीपंप वीजजोडणी, जिल्ह्यातील धरणप्रकल्पातील पाणीपरिस्थिती, अवेळी पाऊस आणि अन्य कारणामुळे मार्चअखेर झालेल्या नुकसानीचे पैसे वितरण, गोपिनाथ मुंडे शेतकरी अपघात सानुग्रह अनुदान योजनेतून देण्यात आलेले अनुदान आदी माहिती देण्यात आली. श्री. हिरेमठ यांनी आत्मा यंत्रणेकडून राबविण्यात येणाऱ्या शेतीशाळा, सेंद्रीय शेती प्रकल्पाबाबत सादरीकरण केले.

## टॉवर लाईन तुटली; ४५ गावांचे वीज कनेक्शन खंडित

हिंजवडी । प्रतिनिधी

महापारेषण कंपनीच्या २२० केव्ही टॉवर लाइनची दोनपैकी एक वीजवाहिनी तुटल्याने पिरंगुट २२० केव्ही व हिंजवडी २२० केव्ही उपकेंद्रांचा व पर्यायाने महावितरणच्या २० वाहिन्यांचा वीजपुरवठा मंगळवारी (दि. १६) सकाळी ९.१० वाजता बंद पडला. परिणामी हिंजवडी, माण, मारुंजी, नेरे, कासारसाई, भुकूम, भूगाव, पिरंगुट, कोळवण खोरे, मुठा खोरे आदी मुळशी तालुक्यातील परिसरातील ४५ गावांतील सुमारे ६५ हजार वीजग्राहकांचा वीजपुरवठा बंद आहे. दुपारी चार वाजेपर्यंत दुरुस्ती काम पूर्ण होईल. त्यानंतर वीजपुरवठा पूर्ववत होणार असल्याची माहिती महापारेषणकडून देण्यात आली.

याबाबत माहिती अशी की, कोकणातील रोहा येथून महापारेषणच्या कांदळगाव २२० केव्ही अतिउच्चदाब उपकेंद्रातून टॉवर लाइनद्वारे पिरंगुट व हिंजवडी येथील महापारेषणच्या २२० केव्ही अतिउच्चदाब उपकेंद्राला वीजपुरवठा करण्यात येतो. मात्र कांदळगाव २२० केव्ही टॉवर लाइनची एक वीजवाहिनी आंबेगाव (ता. मुळशी) येथे मंगळवारी (दि. १६) सकाळी ९.१० वाजताच्या सुमारास तुटली. त्यामुळे पिरंगुट व हिंजवडी अतिउच्चदाब उपकेंद्रांचा वीजपुरवठा बंद पडला. तर या उपकेंद्रांवर अवलंबून असलेल्या महावितरणच्या सुमारे २० वीजवाहिन्यांचा वीजपुरवठा देखील खंडित झाला. त्यामुळे मुळशी तालुक्यातील भुगाव, भुकूम, पिरंगुट, उरावडे, कोळवण खोरे, मुठा खोरे, पौड, माले, माण, मारूंजी, कासारसाई, नेरे, दत्तवाडी, हिंजवडीच्या काही भागांसह ४५ गावांतील सुमारे ६५ हजार वीजग्राहकांचा वीजपुरवठा खंडित झाला आहे.

महापारेषणची अतिउच्चदाब वीजवाहिनी तुटल्याने ७० मेगावॅट विजेची पारेषण तूट निर्माण झाली आहे. मात्र तापलेल्या उन्हामुळे विजेची मागणी वाढत आहे. त्यात ७० मेगावॅट विजेचे भारव्यवस्थापन करून पर्यायी वीजपुरवठा उपलब्ध करून देणे तांत्रिकदृष्ट्या अशक्य आहे. त्यामुळे महापारेषणकडून तुटलेल्या अतिउच्चदाब वीजवाहिनीच्या दुरूस्ती कामाला वेग देण्यात आला आहे. दुपारी ४ वाजेपर्यंत तुटलेल्या वीजवाहिनीचे दुरुस्ती काम पूर्ण होईल व साधारणतः ५ वाजेपर्यंत टप्प्याटप्प्याने मुळशी तालुक्यातील ४५ गावांचा वीजपुरवठा पूर्ववत करण्यात येईल.

याबाबतीत महावितरणचे अभियंता आनंद घुले यांना विचारले असता, सदर दुरूस्ती काम करण्यास ४-५ तास लागू शकतात. तोपर्यंत दुसरीकडून लोड घेऊन लाईट चालू करण्याचा प्रयत्न राहिल, त्यामुळे वीजवितरण लवकर सुरू होऊ शकते. मात्र उन्हाळा असल्याने वीडेची सर्वत्र मागणी असल्याने दुसरीकडे जोडणीमधून वीज कधी आणि किती उपलब्ध होईल यावर वीज वितरण कधी व किती सुरू होईल हे अबलंबून राहणार असल्याचे त्यांनी सांगितले.

# महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सन्मानाने जगण्याचा हक्क दिला -डॉ. प्रकाश पवार

पिंपरी । प्रतिनिधी

हजारो वर्षांची जातीयतेची आणि वर्गीयतेची उतरंड महात्मा जोतीराव फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी नाकारली. उपेक्षित - वंचित घटकांना या महामानवांनी शिक्षणाची संधी निर्माण केली. महात्मा फुले यांनी स्त्री - शिक्षणाला प्राधान्य देत प्राथमिक शिक्षणावर भर दिला, तर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी 'शिका, संघटित व्हा व संघर्ष करा' असा नारा देत उच्च शिक्षणावर भर दिला. माणसाच्या जीवनात सर्वांगीण परिवर्तन शिक्षण करू शकते हा आत्मविश्वास दिला. एकूणच काय भारतीय समाजव्यवस्थेतील प्रत्येक घटकाला सन्मानाने जगण्याचा हक्क प्राप्त करून दिला, असे प्रतिपादन फर्ग्युसन महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. प्रकाश पवार यांनी केले. रयत शिक्षण संस्थेच्या महात्मा फुले महाविद्यालयात राज्यशास्त्र विभागाच्या वतीने महात्मा जोतीराव फुले व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची संयुक्त जयंती साजरी करण्यात आली, सदर कार्यक्रमात ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो. (डॉ.) माधव सरोदे होते. महात्मा जोतीराव फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतीय समाजव्यवस्थेला नवी दिशा देण्याचे अनमोल कार्य केले. अशा थोरा - मोठ्यांचे विचार शिक्षकांनी विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवावेत व विद्यार्थ्यांनी ते समाजापर्यंत पोहोचवावेत असा मनोदय व्यक्त करत समाजप्रबोधनाची चळवळ सतत तेवत राहिली पाहिजे असा आशावाद त्यांनी व्यक्त केला.



कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा.राजेंद्र पुजारी यांनी केले. कार्यक्रमास उपप्राचार्य डॉ. मृणालिनी शेखर, डॉ. दत्तात्रय हिंगणे, डॉ. संदीप नन्नावरे, प्रा. गणेश भांगरे, डॉ. तृप्ती अंब्रे, पर्यवेक्षक प्रा. रूपाली जाधव, प्राध्यापक, शिक्षकेतर सेवक, विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते.

सदर प्रसंगी वाचन संस्कृती रुजावी, थोरा - मोठ्यांचे विचार विद्यार्थी आणि समाजापर्यंत पोहोचावेत यासाठी राष्ट्रीय सेवा योजना, इतिहास विभाग व ग्रंथालय विभाग यांच्या सयुंक्त विद्यमाने ग्रंथ प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले.

# डिझेल चोरणारी टोळी पुणे ग्रामीण पोलिसांकडून गजाआड, १७ लाखांचा मुद्देमाल जप्त

पुणे । प्रतिनिधी

रात्रीच्या वेळी रस्त्यलगत उभ्या केलेल्या वाहनांमधील डिझेल चोरणाऱ्या सराईत गुन्हेगारांच्या टोळीला पुणे ग्रमीण पोलिसांच्या आळेफाटा पोलिसांनी अटक केली आहे. अटक केलेल्या आरोपींकडून दोन कार व डिझेल असा एकूण १७ लाख ५२ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

कुणाल रोहिदास बोंबले, ओमकार काळुराम देवकर, राहुल संजय हिंगे (सर्व रा. राजगुरुनगर, जि. पुणे) अशी अटक केलेल्या तिघांची नावे आहेत. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ३ एप्रिल रोजी रात्रीच्या वेळी आळेफाटा परिसरातील भोसले पेट्रोल पंपासमोर असलेल्या ट्रान्सपोर्ट ऑफिससमोर उभ्या असलेल्या हावामधून ६० लिटर डिझेल चोरीला गेले होते. याप्रकरणी रुपेश ज्ञानेश्वर वाळूंज यांनी आळेफाटा पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. त्याच रात्री बाह्यवळण पुलाजवळ लावलेल्या योगेश पाडेकर व सुदर्शन जाधव यांच्या वाहनामधून डिझेल चोरी झाली होती.





या गुन्ह्यांचा तपास करत असताना आळेफाटा पोलिसांना राजगुरुनगर येथील तिघेजण वाहनांमधील डिझेल चोरी करत असल्याची माहिती मिळाली. त्यानुसार तपास पथकाने राजगुरुनगर येथे आरोपींचा शोध घेऊन तिघांना ताब्यात घेतले. आरोपींनी आळेफाटासह मंचर, पारगाव कारखाना हद्दीत वाहनामधून डिझेल चोरल्याचे कबुल केले आहे. त्यांच्याकडून ५७५ लिटर डिझेल व गुन्ह्यात वापरलेल्या कार (एम.एच. ०४ एफ. एफ. ००४१) व कार (एम.एच. ०४ एच.एफ. ३८८८) असा एकूण १७ लाख ५२ हजार रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला

ही कामगिरी पोलीस अधीक्षक पंकज देशमुख, अप्पर पोलीस अधीक्षक रमेश चोपडे, उपविभागीय पोलीस अधिकारी रवींद्र चौधर, पोलीस निरीक्षक सतीश होडगर यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलीस निरीक्षक सुनील बडगुजर, सहाय्यक फौजदार चंद्रा डुंबरे, पोलीस अंमलदार विनोद गायकवाड, भीमा लोंढे, पंकज पारखे, अमित माळुंजे, हनुमंत ढोबळे, प्रवीण आढारी, नवीन अरगडे यांच्या पथकाने केली.

# अखेर घरफोडी करणारे दोघे जेरबंद

शिरूर :वा : रांजणगाव एमआयडीसी पोलिसांनी घरफोडी केलेले दोन आरोपी गजाआड केले. रेहान रमजान लदाफ (वय २०, रा. नुरानी मस्जीदजवळ लक्ष्मीनगर, येरवडा, पुणे) आणि झैद नईम शेख (वय २१, रा. आर. के. चौक लक्ष्मीनगर, येरवडा, पुणे) अशी अटक करण्यात आलेल्या दोघांची नावे आहेत. याबाबत पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पुणे-अहमदनगर महामार्गालगत असलेल्या हॉटेल अमर इनच्या काउंटरमधून रात्रीच्या वेळी दोन मोबाईल व ३० हजार रुपये चोरट्यांनी पळविले होते. याबाबत गुन्हा दाखल करण्यात आला होता. या गुन्ह्याचा तपास गुन्हे शोध पथकाचे अंमलदार करीत होते.

त्यांनी घटनास्थळ व महामार्गावरी १५० सीसीटीव्ही कॅमेरे तपासून, तसेच तांत्रिक विश्लेषण व गोपनीय माहितीच्या आधारे तपास करून रेहान लदाफ आणि झैद शेख यांना अटक केली. त्यांच्याकडे चौकशी केली असता, त्यांनी अशा प्रकारचे रांजणगाव पोलिस ठाणे हद्दीतील घरफोडीचे तीन गुन्हे व मंचर पोलिस ठाणे हद्दीतील १ गुन्हा केला असल्याची कबुली दिली. त्यांच्याकडून वरील गुन्ह्यांतील चोरीस गेलेले २ मोबाईल फोन व ९ हजार रुपये रोख रक्कम, तसेच गुन्हा करताना वापरलेली ४० हजार रुपये



किमतीचे वाहन असा एकूण ७० हजार ५२८ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. ही कारवाई शिरूरचे उपविभागीय पोलिस अधिकारी प्रशांत ढोले व पोलिस निरीक्षक महादेव वाघमोडे यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक फौजदार दत्तात्रय शिंदे, पोलिस जवान उमेश कुतवळ, विजय शिंदे, पोलिस हवालदार नागरगोजे यांनी केली.

## लग्नाच्या दिवशीच नवरदेवाने संपवले जीवन; लग्नमंडपात शोककळा

पिंपरी :: लग्नाच्या दिवशीच नवरदेवाने जीवन संपवले. ही धक्कादायक घटना तळेगाव येथे उघडकीस आली. सूरज राजेंद्र रायकर (२८, रा. माळी नगर, तळेगाव) असे आत्महत्या केलेल्या नवरदेवाचे नाव आहे. वरिष्ठ पोलीस निरीक्षक किशोर पाटील यांनी दिलेल्या माहितीनुसार, सुरज याचा लग्नसोहळा पार पडणार होता. घरात सगळीकडे लग्नाची धामधूम सुरू होती. दरम्यान, सकाळी त्याने मामाला फोन केला. मला लग्न करायचे नाही, असे सांगून तो घराबाहेर पडला.



घरातल्या मंडळींनी सर्वत्र शोधाशोध केली. मात्र, सुरज मिळून आला नाही. काही वेळानंतर घरापासून काही अंतरावर वाण्याचा मळा येथील विहिरीजवळ सुरज याची दुचाकी असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. पोलिसांना शंका आल्याने त्यांनी काही स्वयंसेवकांच्या मदतीने विहिरीत शोध घेतला. त्यावेळी सुरज याचा मृतदेह मिळून आला. या घटनेमुळे तळेगाव परिसरात एकच खळबळ उडाली आहे. पुढील तपास तळेगाव दाभाडे पोलीस करीत आहे.

# चाकूने तरुणाच्या गळ्यावर सपासप वार..

पुणे : : एक वर्षापूर्वी झालेला वाद आणि तरुणाच्या वडिलांनी केलेल्या मारहाणीच्या रागातून सराईत गुन्हेगाराने २९ वर्षीय तरुणाला मटण खाण्यास घालतो म्हणत अंधारात नेऊन अचानक गळ्यावर चाकूने वार करीत ठार मारण्याचा प्रयत्न केल्याची घटना घडली. पुण्याच्या मध्यभागातील राजेंद्रनगर येथे घोलप मटण शॉपसमोर रात्री साडेसातच्या सुमारास हा प्रकार घडला. यात तरुण गंभीररीत्या जखमी झाला असून, त्याला तब्बल १९ टाके पडले आहेत. सध्या त्याच्यावर ससून रुग्णालयात उपचार सुरू असल्याचे पोलिसांनी सांगितले.

याप्रकरणी विश्रामबाग पोलिस ठाण्यात सिद्धार्थ दत्तात्रय मोरे (वय २४, रा. सेनादत्त पेठ) याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला. या घटनेत हिंगणे खुर्द येथील तरुण गंभीररीत्या जखमी झाला. पोलिसांच्या माहितीनुसार, सिद्धार्थ मोरे पोलिसांच्या रेकॉर्डवरील गुन्हेगार असून, त्याच्यावर विश्रामबाग व सिंहगड रोड पोलिस ठाण्यांत गुन्हे दाखल आहेत. दरम्यान, सिद्धार्थ व तक्रारदार तरुण गेल्या सहा ते सात वर्षांपासून ओळखीचे आहेत. गेल्या वर्षी या दोघांमध्ये वाद झाले. त्या वेळी सिद्धार्थला तक्रारदार तरुणाच्या वडिलांनी मारहाण केली. त्याचा राग आरोपीच्या मनात होता.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा जयंती कार्यक्रम पाहण्यासाठी दोघे दांडेकरपूल परिसरात आले. त्या वेळी दोघांची पुन्हा भेट झाली. त्यानंतर सिद्धार्थने 'चल तुला मटण खाऊ घालतो,' असे सांगितले. त्याला गोड बोलून गाडी चालविण्यास दिली. तो पाठीमागे बसला. दोघे राजेंद्रनगर येथील मटण शॉपवर गेले. गाडीवरून उतरत सिद्धार्थने गेल्या वर्षी झालेल्या भांडणाचा राग मनात ठेवून अचानक तरुणाच्या गळ्यावर धारदार चाकूने वार केला. तरुणाने प्रतिकार करण्याचा प्रयत्न केला. पण, दुसरा वार हातावर बसला. त्याचवेळी तरुणाचा मित्र त्याला वाचविण्यास आल्यानंतर त्यालाही आरोपीने मारहाण केली. या घटनेत तरुण गंभीररीत्या जखमी झाला आहे. तपास सहायक निरीक्षक पी. एम. वाघमारे करीत आहेत.

# शेतीपंपाच्या भारनियमनात सुधारणा करा; अन्यथा आंदोलन

मंचर : : आंबेगाव, शिरूर तालुक्यांतील शेतीपंपाचा वीजपुरवठा वारंवार खंडित होत असल्याने शेतकरी त्रस्त झाले आहेत. वीजपुरवठा सुरळीत करावा, या मागणीसाठी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या वतीने मंचर महावितरण कार्यालयासमोर सोमवारी (दि. १५) दुपारी ठिय्या आंदोलन करण्यात आले. शेतीपंपाच्या वीज भारनियमनाबाबत १५ दिवसांमध्ये परिस्थिती सुधारली नाही, तर दि. १ मेपासून आंदोलन करण्याचा इशारा राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे कार्याध्यक्ष देवदत्त निकम यांनी दिला.

आंबेगाव, शिरूर तालुक्यांतील शेतीपंपाचा वीजपुरवठा सुरळीत करावा, वाढलेले भारनियमन कमी करावे तसेच शेतीला दिवसा वीजपुरवठा व्हावा, या मागण्यासाठी महावितरण कंपनीला निवेदन देण्यात आले होते. त्यानंतर वरील मागण्यासाठी मंचर येथील महावितरणच्या कार्यालयासमोर ठिय्या आंदोलन करण्यात आले.

या वेळी माजी सरपंच बाळासाहेब बाणखेले, धोंडीभाऊ भोर, गणेश यादव, दादाभाऊ थोरात, पूजा वळसे पाटील, संजय बढेकर, भरत मस्के, स्वप्निल बांगर, कुणाल बाणखेले, नवनाथ करंडे, बाबाजी इंदोरे, शंकर पिंगळे, मंगेश टेमकर, दौलत भोर, बंडेश वाघ, विशाल वाबळे आदी शेतकरी आणि कार्यकर्ते उपस्थित होते. या वेळी जोरदार घोषणा देण्यात आल्या. देवदत्त निकम म्हणाले मार्च, एप्रिल महिन्यांमध्ये पूर्वकल्पना न देता शेतीपंपाचा वीजपुरवठा खंडित केला जातो. या संदर्भात पाठपुरावा करूनही त्याची दखल घेतली गेली नाही. आम्ही निवेदन देऊन इशारा दिल्यानंतर काही प्रमाणात भारनियमन कमी झाले आहे. हा शेतकरी एकजुटीचा निम्मा विजय आहे. मात्र, शेतकर्यांची पिके पाण्याअभावी जळू लागली आहेत. शेतीपूरक व्यवसायाला फटका बसला आहे. बळीराजा आता अन्याय सहन करणार नाही, असे सांगून बिबट प्रवण क्षेत्रात शेतीसाठी दिवसा अखंडित वीज मिळाली पाहिजे, अशी मागणी त्यांनी केली. या वेळी पूजा वळसे पाटील, दादाभाऊ थोरात, दादाभाऊ करंडे, हेमंत करंडे, मंगेश टेमकर आदींनीदेखील



शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले. दरम्यान, महावितरण कंपनीचे कार्यकारी अभियंता शांताराम बांगर यांची शेतकर्यांच्या शिष्टमंडळाने भेट घेतली व समस्या समजावून घेतल्या. त्या वेळी आपले म्हणणे वरिष्ठांच्या कानावर घातले जाईल, असे बांगर यांनी सांगितले.

## तुळशीबाग येथे गर्दीत केली महिलेची पर्स लंपास; सव्वा लाखांचा ऐवज चोरीला

पुणे । प्रतिनिधी

पुण्यातील तुळशीबागेत गर्दीचा फायदा घेऊन चोरट्यांनी एका महिलेची पर्स चोरून नेली. चोरट्यांनी पर्समधील एक लाख २१ हजार ४०० रुपयांचा ऐवज चोरून नेला. याप्रकरणी विश्रामबाग पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याप्रकरणी मुळशी तालुक्यातील पिरंगूट येथे राहणाऱ्या ४७ वर्षीय महिलेने फिर्याद दिली आहे. यावरुन पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी महिला नातेवाईकांसोबत रविवारी तुळशीबागेत खरेदीसाठी आली होती. याठिकाणी फिरत असताना त्यांनी मक्याचे कणीस खरेदी केले. त्याचे पैसे दिल्यानंतर हँड पर्स कापडी पिशवीत ठेवली. या पर्समध्ये मिनी गंठण आणि सोन्याचे कानातले व रोख रक्कम होती.

फिर्यादी तेथून पायी चालत तुळशीबागेतील कावेरी आईसक्रीम सेंटर येथे आल्या.

आईस्क्रीम घेण्यासाठी पैसे देण्याकरता त्यांनी पिशवीमधून पर्स काढण्याचा प्रयत्न केला.त्यावेळी त्यांना पिशवीत पर्स दिसली नाही. पर्स चोरीला गेल्याचे लक्षात आल्यानंतर त्यांनी विश्रामबाग पोलीस ठाण्यात जाऊन तक्रार दिली. पोलिसांनी चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल करुन शोध सुरु केला आहे. पुढील तपास पोलीस करीत आहेत.